१८ ऑगस्ट २०१६, गुरुवार

ॐ

# — अपरोक्षानुभूति —

ॐ श्रीहरिं परमानन्दं उपदेष्टारं ईश्वरम् ।
व्यापकं सर्वलोकानां कारणं तं नमोम्यहम् ॥ १ ॥

ओंकारस्वरूपी परमानंद - गुरु - ईश्वर, सर्वव्यापक व सर्व लोकांना कारण असा त्या श्रीहरीला मी नमस्कार करते.

मंगलाचरण हे ॐ, अथ, स्वस्ति, अशा शुभ शब्दाने सुरुवात केलेले वंदन (आहे) असते.

अनुभव आणि अनुभूतिप्रमाणेच मोक्ष व मुक्ति यामध्ये सूक्ष्म भेद आहे.

मंगल हा शब्द शुभ, कल्याणकारक, हितकर असा अर्थ सूचित करतो. मात्र ही शुध्दता अंतर्बाह्य असणे म्हणजे मंगळ! वातावरणाही मंगल असावे, आणि मुख्य म्हणजे तिथे असणाऱ्या सर्वांच्या वृत्ति मंगलमय असाव्यात.

या ठिकाणी परब्रह्म, सृष्टी या सर्वांना आवाहन केले आहे. जीवनात अनेकदा आपल्याला आनंदाचा अनुभव येतो. परंतु उच्चकोटिच्या आनंदाला इथे परमानन्द म्हटले आहे. सच्चिदानंद - आनंदघन, परमानन्दम्

उपदेष्टारम् - सद्गुरु (शिव) आत्मविद्या, परमार्थबोध करणारा

ईश्वरम् - चित् स्वरूप ईश्वर हे परब्रह्माचे शबल रूप आहे मायेची उपाधि लागल्यामुळे तो शबल होतो. ही सर्व नारायणाची सत्ता आहे.

नार (नीर - पाणी) हेच ज्याचे अयन आहे तो नारायण!

केशव - ब्रह्मा, विष्णु, महेश या तीनही शक्ती शबलत्वामध्ये प्रगट झाल्या. क + ईश + व

केशव हा अमूर्त आहे. त्याची कुठेही मूर्ति / मंदिर नाही.

©www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

DECEMBER 2014

सर्वांना व्यापून शिल्लक उरलेला म्हणून त्याला
व्यापकम् म्हटले आहे.
सगळ्या म्हणजे १४ लोकांचे कारण जो
आहे. त्यांच्या उत्पत्तीला जो कारण आहे तो
सर्वलोकानां कारणम्।
आणि सर्व संकटांचे हरणे करणारा तो हरि।
षडैश्वर्य संपन्न हरि म्हणून श्रीहरि
त्याला वंदन करण्यासाठी वृत्ति व्यापक व्हायला हवी
अशा सच्चिदानंदघनाला मी वंदन करीत आहे.

© www.madhaveeraghuveer.com

अपरोक्षानुभूतिः वै प्रोच्यते मोक्षसिद्धये।
सद्भिरेव प्रयत्नेन वीक्षणीया मुहुर्मुहुः॥२॥

मोक्षसिद्धीसाठी ही अपरोक्षानुभूति ग्रंथ सांगता। सत्पुरुषांनी म्हणजे अधिकारी पुरुषांनी तिचा प्रयत्नपूर्वक वारवार विचार करावा.

सत्पुरुषांनी या मोक्षसिद्धीसाठी प्रयत्नपूर्वक अभ्यास करावा. अजून जे तिथपर्यंत पोहोचले नाहीत परंतु त्यांना मोक्षाची तीव्र इच्छा आहे अशांना इथे सद् - सज्जन, सत्पुरुष म्हटले आहे. आणि वारवार प्रयत्न करावा असेही म्हटले आहे.

सिद्धांची जी लक्षणे ती साधकांची साधने। इतरांसाठी व मुख्य स्वतःसाठी सिद्धांनी सुद्धा पुन्हा पुन्हा त्याचा विचार करावा.

परा भक्ति - सर्व खल्विदं ब्रह्म चा अनुभव येतो.

SUNDAY 11

© www.madhaveeraghuveer.com

~~स्ववर्णाश्रम~~

स्ववर्णाश्रमधर्मेण तपसा हरितोषणात् ।
साधनं प्रभवेत् पुंसां वैराग्यादिचतुष्टयम् ॥३॥

स्वतःच्या वर्णाश्रमधर्माने, तपाने, ईश्वरप्रसादाने पुरुषाला म्हणजे कोणाही जन्माला आलेल्या माणसाला वैराग्यादि साधनचतुष्टयाचा लाभ मिळवता येतो.

प्रत्येकाने स्वतःच्या वर्ण व आश्रमाप्रमाणे कर्मे करावीत. त्यासाठी प्रथम स्वतःचा वर्ण आणि आश्रम तपासून पहावा. वर्ण हा केवळ जन्माने ठरत नाही, तर त्या त्या वर्णात सांगितल्याप्रमाणे माझी कर्मे होत आहेत का? कारण केवळ ब्राह्मण कुळात जन्म झाला आणि व्यापारी वृत्ति जर प्रबळ असेल तर त्याचा वैश्य वर्ण समजावा.

त्याचप्रमाणे आपल्या संस्कृतित आश्रमव्यवस्था फार विचारपूर्वक निर्माण केली आहे.

उपनयनानंतर १२ ते १६ वर्षे गुरुगृही अध्ययन सांगितले आहे. ब्रह्मचर्याश्रम.

त्यानंतर सुशील आणि कुलीन मुलीशी विवाह करुन गृहस्थाश्रमात प्रवेश करावा.

धन्यो गृहस्थाश्रमः असे म्हटले जाते, कारण समाजातील सर्व घटकांची - विशेषतः इतर तीनही आश्रमांची जबाबदारी गृहस्थावर असते. केवळ संपत्ति मिळवून आपले घर चालवणे एवढेच गृहस्थाचे कर्तव्य नाही तर जागरूकपणे समाजात राहून समाजस्थिति उत्तम राखण्याची जबाबदारी गृहस्थावर असते. घरातील लहान मुले, गर्भवती स्त्रिया, वृद्ध मंडळी, अतिथि अभ्यागत, पै-पाहुणा, निराधार व्यक्ती या सर्वांच्या गरजा डोळसपणे पाहून त्यावर यथाशक्ती उपाय करणे हा

© www.madhaveeradhuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

DECEMBER - 2014

खरा गृहस्थधर्म आहे. गृहस्थाच्या बरोबरीने गृहिणीचा सहभाग असावा.

गृहस्थाश्रमातील सर्व कर्तव्ये पार पाडत असताना तेव्हा मुलं मोठी होतात, त्यांचे विवाह होऊन कर्तीसवरती होतात तेव्हा गृहस्थाने वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. म्हणजे प्रत्यक्ष वनात जाणे नाही तर घरातच राहून आवश्यक तेथे आणि गरज पडल्यासच मार्गदर्शन करणे. स्वत:च्यात राहून आनंदात राहणे हा वानप्रस्थाश्रम।

आणि पुढे आपली गरज कमी कमी करत त्यातून पूर्णपणे बाजूला होणे हा संन्यासाश्रम। परमेश्वराचे चिंतन, वैयक्तिक साधना हीच इतिकर्तव्यता।

अशा प्रकारे आपला वर्ण व आश्रम ओळखून त्यानुसार दिनक्रम आखणे आणि पूर्वीच्या आश्रमात त्याप्रमाणे वर्तन घडले होते किंवा नाही याचा पुनर्विचार करावा.

तपसा - स्वधर्माचरण हेही एक तपच आहे. तपश्चर्या कष्टाशिवाय होत नाही. ती एक कसोटी आहे. विघ्नांचा त्रास न मानता तप पूर्ण करावे.

श्रीधर स्वामी - सोवळ्यात भोजनाचा नियम होता. इतरांनी (स्वयंपाक्याने) तो पाळला नाही तरी त्यांचे व्रत त्यांनी सुरू ठेवले.

चालते हे शरीर कोणाचिये सत्ते
कोण बोलविते हरिवीण?

दैव - दैवाचा अनुग्रह हवा. तुझ्यामुळे, तुझ्याचसाठी, तुलाच अर्पण।

हरितोषणात - स्मृतिमात्रेण पुंसां पापं वा संसार हरति इति हरि:।

अंतर्यामीच्या परमेश्वराला तुष्ट करावे - सच्चिदानंद असत, जड आणि उद्वेगाला थारा देऊ नये.

मागणी करताना नेहमी इष्टाची करायची.

या श्लोकातून बैठक तयार झाली. आता त्यावर चौथरा उभा करायचा आहे.

साधनचतुष्टय - चार भिंती बांधायच्या आहेत.

६ सप्टेंबर २०१६ गुरुवार



ब्रह्मादिस्थावरान्तेषु वैराग्यं विषयेष्वनु ।
यथैव काकविष्ठायां वैराग्य तद्धि निर्मलम् ॥४॥

ब्रह्मादि लोकांपासून स्थावरापर्यंत म्हणजे इहलोका-तील जड वस्तु विषयांसंबंधी काकविष्ठेप्रमाणे वैराग्य भावना असणे (तिरस्कार वाटणे) हेच निर्मळ (शुद्ध) वैराग्य होय.

वैराग्य- इहामुत्रफलभोगविराग
इह- हा मृत्युलोक आणि अमुत्र म्हणजे इतर लोक.
वैराग्य दोन प्रकारचे — १. शुद्ध वैराग्य २. अशुद्ध वैराग्य
विराग — विगतं रागं यस्मात् तद् ।
विशिष्टं रागं यस्मिन् तद् ।
प्रपंचाबद्दल अनासक्ती परंतु सच्चिदानंदाबद्दल आसक्ती हवी
ययाती आणि यती यांमध्ये मूलभूत अंतर आहे.
भोगवासना जागृत आणि प्रबळ असणारा तो ययाति व प्रेमाचा विषय केवळ परमेश्वर असणारा तो यति ।
अन्नपूर्णा स्तोत्रामध्ये आचार्यांनी पार्वती देवीला भिक्षा मागितली आहे ती ज्ञानवैराग्यसिद्ध्यर्थम् ।
साधन हे आपल्याला शिस्त लावण्यासाठी असते. व्रत वैकल्ये
खरे वैराग्य ज्या क्षणी उत्पन्न होईल तो क्षण मुक्तीचा आहे.

नित्यमात्मस्वरूपं हि दृश्यं तद् विपरीतगम्।
एवं यो निश्चयः सम्यक् विवेको वस्तुनः स वै ॥५॥

आत्मस्वरूपच केवळ नित्य असून त्याच्या विपरीत सर्व दृश्य अनित्य होय. अशा तऱ्हेचा हा निश्चय सम्यक विवेक असून तोच वस्तुविवेक होय.

आत्मतत्त्व हे नित्य आहे आणि अनात्मतत्त्व हे अनित्य आहे याविषयीचा विवेक पक्का हवा.

यद् दृष्टं तद् नष्टम्। जे जे उत्पन्न होते, जे जे दृष्टीला पडते ते ते सर्व संपणारे आहे, नाशिवंत आहे.

या विवेकाखेरीज वैराग्याला बळकटी येत नाही.

व्यवहारात आपण साध्या साध्या गोष्टी घेताना देखील त्याच्या टिकाऊपणाचा विचार करतो मात्र जीवनात सर्वात शाश्वत, टिकाऊ चिरंतन काय आहे याचा विचार न करता अशाश्वतातच रमतो.

केवळ आत्मस्वरूप हेच नित्य आहे.

दृक् दृश्यौ द्वौ पदार्थौ।

ब्रह्म हे अनादि अनंत आहे

माया सुद्धा अनादि आहे परंतु तिला अंत आहे.

अव्यक्त ⟶ महत्तत्त्व ⟶ अहंकार

अव्यक्त — शबलत्व — स्फुरण
इच्छा माया
बुद्धि कर्तृत्व भोक्तृत्व.

© www.madhuveeraghuveer.com

सदैव वासनात्यागः शमोऽयं इति शब्दितः ।
निग्रहो बाह्यवृत्तीनां दम इत्यभिधीयते ॥ ६॥

वासनांचा सदैव त्याग करणे, त्याला शम (अशी संज्ञा) अशा शब्दाने व्यक्त केले जाते, तर विषयांकडे धावणाऱ्या बाह्य वृत्तींचा निग्रह करणे - त्यांना पराङ्मुख करणे याला दम असे म्हणतात.

दम कशासाठी करायचा? याचे उत्तर येथे दिले आहे.

शम — वासनात्याग तर दम - वृत्तींचा निग्रह.

वासना म्हणजे चिकटून बसणारी इच्छा. वासना ही सूक्ष्म देहाला चिकटून राहते. कोणतीही वासना शिल्लक राहिली तर पुढच्या जन्म वाघ, सिंह, सर्प, नाग असा हिंस्त्र पशूंचा येतो.

वासनांची परिपूर्ति तरी करा किंवा त्या उखडून टाका. भक्ताच्या मनात जी वासना उठेल ती पूर्ण करण्याचे काम भगवंतच करतो. तुमच्या मनात बासुरी वाजण्याची इच्छा झाली तर कोणत्या ना कोणत्या रुपाने ती पूर्ण होते.

समर्थ - धृतकळी.

योगक्षेमं वहाम्यहम् ।

मनोजय - मनावर विजय मिळवणे. मन आपले गुलाम व्हायला हवे. मनात जशी इच्छा होईल तशी इंद्रिये धावायला लागतात. त्यांचा निग्रह करायला हवा.

SUNDAY 18

भोगाची, कर्तृत्वाची इच्छा सुद्धा असू नये. नाहीतर मन सतत धावत राहते.

© www.madhaveerabhuveer.com

विषयेभ्यः परावृत्तिः परमोपरतिर्हि सा।
सहनं सर्वदुःखानां तितिक्षा सा शुभा मता॥७॥

उपरति - मागे फिरणे (मानसिक)
तितिक्षा - सर्व दुःखे सहन करणे
दुःखाचे कारण कुणीतरी परका असतो.
मात्र तितिक्षेसाठी रागद्वेषाच्या पलीकडे जायला हवे.
अनुकूलतया सुखं, प्रतिकूलतया दुःखम्।
एकनाथ महाराजांना अनेकदा विंचू चावला तरीदेखील त्यांची तितिक्षा टिकून राहिली.

© www.madhaveeraghuveer.com

निगमाचार्य वाक्येषु भक्तिः श्रद्धेति विश्रुता।
चित्तैकाग्र्यं तु संलक्ष्ये समाधानमिति स्मृतम्॥८॥

सत् हेच लक्ष्य आहे. त्या ठिकाणी चित्त एकाग्र होणे हे समाधान आहे. सम् + धा (ठेवणे) -

सत् स्वरूपापाशी चित्त सतत ठेवणे म्हणजे समाधान।
समाधानाने जगणे ही मूळ संपत्ती आहे.

वेदांनी / आचार्यांनी सांगितलेल्या वाक्यांविषयी आत्यंतिक प्रीति असणे म्हणजे भक्ति।

~~वेद~~ वेद जे सांगतात ते बहुधा भोगाविरुद्धच असते. त्यामुळे लोकांचा सहजपणे विश्वास बसत नाही.

वेद / गुरु वचनावर विश्वास असणे म्हणजे श्रद्धा।
श्रद्धा असते किंवा नसते, परंतु अंध कधीच नसते.

लक्ष्यप्राप्तिकडे लक्ष लागून राहणे हेच समाधान।
कारणाविना तृप्ति हेच समाधान।

त्यांचे (आचार्य) व आपले लक्ष्य एकच असते तेच समाधान। Waves, Vibrations

षड्रिपुंना नाहीसे करण्यासाठी वेद संपत्ति आहे.

षड्रिपु हे मोक्षसिद्धीचे शत्रु आहेत. ते केवळ ऐहिकाचा नाश करत नाहीत तर अध्यात्ममार्गावर नुकसान करतात.

8 Sept. 2016
गुरुवार



| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

DECEMBER - 2014

संसारबन्धनिर्मुक्तिः कथं मे स्यात् कदाविधे।
इति या सुदृढा बुद्धिः वक्तव्या सा मुमुक्षता॥ ८॥

माझी या संसारबंधनातून कशी मुक्ति होईल? अशी जी अतिशय दृढ बुद्धि आहे तिला मुमुक्षता असे म्हणतात.

इथे संसार म्हणजे जन्म-मरणाचे फेरे! सुदृढा - तीव्र, जिच्यापुढे सर्व फिके पडेल अशी!

देहबुद्धी नाहीशी झाल्याखेरीज मुमुक्षा दृढ होत नाही. देह म्हणजे तीनही देह - स्थूल, सूक्ष्म, कारण देह.

स्थूल देह हा पंचभौतिक आहे. जो डोळ्यांनी स्पष्टपणे दिसतो. आणि अशा देहाचे लाड केले जातात.

सूक्ष्म देह हा वासनामय असतो. वासना हे इच्छेचेच एक रूप असले तरी वासना ही देहाला चिकटून असते. ती सहजासहजी सुटत नाही. खरवडून काढली तरी थोडा अंश शिल्लक रहातो. मानापमानाच्या कल्पना खोलवर रुतून बसलेल्या असतात. त्यांचा डंख खोलवर गेलेला असतो.

कारण देह - म्हणजेच लिंग देह! स्थूल देह (मृत्युनंतर) सोडताना लिंग देह ज्या वासना घेऊन जातो. त्यामुळे तो पुढच्या जन्माचे कारण ठरतो. त्या त्या वासनानुसार पुन्हा नवीन देहाच्या शोधात तो असतो.

आणि म्हणूनच संध्याकाळी अनिष्ट कर्मे (संभोग इ.) करू नये कारण अशा वेळी अतृप्त आत्मे फिरत असतात. वासनातृप्तीसाठी योग्य देह ते शोधत असतात. त्यातून व्यंगयुक्त, मतिमंद संतति जन्माला येण्याची शक्यता असते.

अशा अतृप्त आत्म्यांना आपल्या घरकुलापासून दूर ठेवण्यासाठीच देवापाशी शांत, सौम्य निरंजन, समई लावावी आणि ईश्वराचे स्मरण, चिंतन करावे.

© www.mudraveeraghuveer.com

'शुभं करोति' सारखी प्रार्थना म्हणावी. घरातील सर्वांनी एकत्र येऊन शुभ बोलावे, ऐकावे.

जय-विजय यांनादेखील (देवांचे द्वारपाल असूनही) तीन जन्म घ्यावे लागले.

हिरण्याक्ष - हिरण्यकशिपु

शिशुपाल - दंतवक्र

गजेंद्र मोक्षाचे आख्यान आपण ऐकतो. परंतु तिथेसुद्धा गजेंद्राला मोक्ष मिळाला नाही. तर उत्तम गति प्राप्त झाली. गजेंद्र आणि मगर दोघेही मागील जन्मीचे गंधर्व होते.

द्वैत संपून जाणे म्हणजे मोक्ष!

मुक्ति आणि मोक्ष यामध्ये थोडासा फरक आहे.

सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता या चारी मुक्तिंच्या पलीकडे जाणे म्हणजे मोक्ष आहे.

आचार्य म्हणतात - न मुक्तिर्न बंधः।

बंधन आणि मुक्तिच्या पलीकडील ही अवस्था आहे.

सगुण रूप — श्री विष्णु / श्रीमन्नारायण

शंख —— विवेक — शंखनाद — शब्द — सत्स्वरूपी आकाश.

चक्र —— शमादि षट्संपत्ति — गति दाखवते.

गदा —— वैराग्य प्राप्त झाले की सामर्थ्य प्राप्त होते.
हनुमान, महावीर.

पद्म —— मुमुक्षता, ब्रह्मानंदाचे प्रतीक - शुद्ध सात्त्विकभाव

→ सामर्थ्याचा अभिमानही नको आणि वैराग्याचा डिंडिम ही नको.

अशा प्रकारे या चार साधनांमुळे (भिंतींमुळे) साधक सुरक्षित होतो, त्याला बाहेरचे आघात जाणवत नाहीत आणि त्याला मोक्षमार्गाचा अधिकार मिळतो.

©www.madhaveeraghuveer.com

उक्तसाधनयुक्तेन विचारः पुरुषेण हि।
कर्तव्यो ज्ञानसिद्ध्यर्थं आत्मनः शुभमिच्छता ॥१०॥

स्वतःचे कल्याण इच्छिणाऱ्या पुरुषाने ज्ञानप्राप्तिसाठी (वर सांगितलेल्या साधनाने युक्त) विचार करायला हवा. विचार म्हणजे त्या विषयाभोवतीच घुटमळत फिरत रहणे. चिंतन ⟶ मनन.

प्रयत्नपूर्वक सतत ब्रह्मविचार करत राहणे.

विचार दोन प्रकारचे

| प्रवृत्ति | निवृत्ति |
|---|---|
| Short cut | हा मार्ग दूरचा असला तरी |
| अनेक देव-देवतांचे पूजन | निश्चित आहे. |

सतत रस्ते (देवता) बदलत राहिले तर ठामपणा रहात नाही. उगीचच वेळ लागतो. व्रतवैकल्ये काही प्रमाणात आवश्यक असली तरी त्याच्यामागे विचार नसेल तर व्यर्थ वेळ मोडतो. असमाधानच वाट्याला येते.

मनुष्यजन्माचे कल्याण केवळ मोक्षप्राप्तित आहे. तेच आणि तेच जीवनाचे उद्दिष्ट असायला हवे.

सत् भोवती विचार फिरणे हा सदाचार तर असत् भोवती विचार फिरणे हा अनाचार आहे.

आपल्या 'विवेकचूडामणि' या दुसऱ्या प्रकरण ग्रंथात आचार्य म्हणतात -

~~अहंकारादिदेहान्तान्बन्धा~~
अहंकारादिदेहान्तान्बन्धानज्ञानकल्पितान् ।
स्वस्वरूपावबोधेन मोक्तुमिच्छा मुमुक्षुता ॥ २७॥

© www.madhavaraghuveer.com

अज्ञान दूर झाल्याखेरीज मोक्षाची इच्छा होणारच
नाही. मुमुक्षु साधक —
8 अवलिया ——— अवधूत
9 समाजविरोधी कार्य — समाजाला अनुकूल!

10 खरी परमार्थता कुठली हे सांगत असताना —
न मुमुक्षुः न वै मुक्तः इत्येषा परमार्थता।
11 असे आचार्य म्हणतात.
जोपर्यंत द्वैत आहे तोपर्यंत चारांपैकी एक आहे.
12 बद्ध —— मुमुक्षु —— साधक —— सिद्ध.
मात्र अनुभूति आल्यावर यापैकी काहीच उरत नाही.
तेच होणे हा परमार्थ आहे.

1

2

3 श्लोक - २० — अच्युत — न ढळणारा ३६
स्वरूपसामर्थ्यात् न च्युतः इति अच्युतः।
ज्याचे शक्तिसामर्थ्य संपते तो पडतो.
मात्र हा कोणाच्या अधिष्ठानावर नाही. उलट त्याच्याच
अधिष्ठानावर सर्व आधारित आहे. तो ढळणारा नाही.
अधिष्ठान — पैसा, सत्ता, बळ, सौंदर्य, विद्या
या सर्वांच्या मुळाशी नम्रतेचे अधिष्ठान असेल तर
त्याला धक्का पोहोचत नाही. मात्र याचा गर्व झाला
की अधोगति सुरु होते. त्यासाठी विनय हवा
विद्या विनयेन शोभते।
आणि हे सर्व संस्कार ब्रह्मचर्याश्रमात केले जातात.
सत्यं वद। धर्मं चर। स्वाध्यायात् मा प्रमद।
नैतिक आचरण टिकायला हवे. नाहीतर नुसती शर्यत
सुरु होते. हाती काहीच लागत नाही.



©www.madhaveeraghuveer.com

नोत्पद्यते विना ज्ञानं विचारेण अन्यसाधनैः ।
यथा पदार्थभानं हि प्रकाशेन विना क्वचित् ॥११॥

विचार हेच आत्मज्ञानाचे महत्त्वाचे साधन आहे. अन्य कोणत्याही साधनांनी ज्ञान उत्पन्न होत नाही. तर ते केवळ विचाराने होते. अनात्म्याच्या अभ्यासासाठी अनेक साधने लागतात. तर स्वप्रयत्न ही आत्मज्ञानातील सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट आहे.

इतर वस्तू पहाण्यासाठी जसा प्रकाश आवश्यक असतो. तसा आत्मज्ञान होण्यासाठी विचारांचा प्रकाश आवश्यक आहे.

साधना ही ज्याची त्यानेच करायची असते.

श्रवण — मनन — निदिध्यास हवा.

श्रवणासाठी दुसऱ्याची आवश्यकता असते. प्रश्न जरूर विचारावेत. शंका घ्याव्या परंतु त्या व्यर्थ असू नयेत. नाहीतर तो असत् विचार होतो.

चिकित्सा नको, चिंतन हवे.

बैठक पक्की व्हायला हवी.

© www.madhaveeraghuveer.com

कोऽहं कथमिदं जातं को वै कर्ता अस्य विद्यते।
उपादानं किमास्ति इह विचारः सोऽयं ईदृशः॥१२॥

मी कोण आहे? हे (विश्व) कसे झाले? याचा कर्ता कोण? हे कशापासून झाले? अशा प्रकारचा हा विचार आहे.

मुळाकडे जाताना खरं तर 'मी कोण' हा पहिला विचार येतो. नंतर सृष्टीकडे नजर जाते. तेव्हा हे कसे उत्पन्न झाले असेल बरे? याचा कर्ता कोण असावा? याची सामग्री काय? याचे कारण कोणते? हाच तत्त्वविचार आहे.

प्रमुख कारणे दोन आहेत — उपादानकारण, निमित्तकारण परंतु उपादानामध्येही दोन विभाग आहेत.

१. समवायी — माती
२. असमवायी — संयोग, एकत्रीकरण = पाणी

आणि निमित्त कारण — इथे कुंभार (चित-चैतन्य)
निमित्तकारण हे नेहमी चेतनच असले पाहिजे

घट फुटला तर त्याची माती होते.
कोणतीही गोष्ट आपल्या मूळ स्वरूपात जाते.

सूक्ष्मातून स्थूलाची निर्मिती झाली
आकाशात् वायुः। वायोः तेजः। तेजात् आपः ---

आणि प्रलय होताना उलट क्रमाने होत जाते.
उभारणीच्या उलट क्रमाने संहारणी आहे.

पृथ्वी पाण्यात विलीन होते. पाण्याला तेज संपवते ---
अशा रीतीने पंचमहाभूते क्रमाक्रमाने आकाशात लय पावतात. परंतु आकाशापेक्षा तरल महत् तत्त्व आहे

आणि तेदेखील अखेरीस सत् चित् आनंदात विलीन होते
सत् चित् आनंद हेच सर्वांचे मूळ कारण आहे.

हे सर्व ज्याचे कर्तृत्व आहे ते स्वतः चैतन्यमय असले पाहिजे.

© www.madhavaveeraghuveer.com

तत्त्वज्ञान व दर्शन यात अंतर आहे.
दर्शनात अनुभूति आहे.
आस्तिक आणि नास्तिक दर्शने आहेत.
जे वेद मानतात ते आस्तिक आणि जे वेद मानत नाहीत ते नास्तिक — चार्वाक, जैन, बौद्ध.
देहाला सर्वस्व मानणारा चार्वाक ही पहिली पायरी असेल तर अद्वैत ही अंतिम पायरी आहे.
पूर्व मीमांसेमध्ये यज्ञाला पुरस्कार आहे.
ज्या शिडीवरून वरपर्यंत (अद्वैतापर्यंत) पोहोचलो ती शिडी सुद्धा सोडून द्यायची आहे. अद्वैतामध्ये 'मी तू' पण उरतच नाही. भगवंत — भक्त, किंवा गुरु — शिष्य हा द्वैतभाव सरून जातो. तद्रूप होऊन जाणे म्हणजे अद्वैत आहे.

पूर्ण - पूर्णावर निर्मितीचा आरोप केला जातो. शून्य हे कधीही अधिष्ठान होऊ शकत नाही. शून्यात अभाव असतो. तर मग पूर्ण म्हणजे काय?
जिथून सुरुवात तिथेच शेवट होणे म्हणजे पूर्ण. रेषा कधीही पूर्ण नसते. मात्र त्रिकोण, चौकोन पूर्ण आहेत. हे वर्तुळामध्येच शक्य आहे. ब्रह्मापासून माया निर्माण झाली. ती अपूर्ण आहे. पुन्हा ती ब्रह्मामध्ये विलीन होते पूर्ण होते. माया खूप फिरते. शेवटी तिला ब्रह्मामध्ये विलीन व्हावे लागते. तिने केलेला विस्तार मिथ्या आहे.
व्यय = वि + इते - विविधता उत्पन्न होते.
मात्र त्याच्यात विविधता नाही आत्म्याला अवस्था नाहीत वृद्धि - क्षय नाही. तिथे काही खर्ची पडत नाही. यौवनात पदार्पण करताना बाल्य खर्ची पडते. तो अतीत आहे. तो अवस्थात्रयातीत आहे.
भूतप्रति बंध / भविष्य प्रतिबंध

©www.madhaveeraghuveer.com

नाहं भूतगणो देहो नाहं चाक्षगणस्तथा।
एतद् विलक्षणः कश्चिद् विचारः सोऽयं ईदृशः ॥१३॥

पंचमहाभूतांचा समुदाय म्हणजे मी नाही. इंद्रियांचा समूह म्हणजे मी नाही. कोणत्याच लक्षणात बसणारा मी नाही. मी वेगळाच आहे. असा विचार आहे.

इथे भूतगण शब्दातून स्थूल देहाविषयी तर अक्षगण शब्दातून सूक्ष्म देहाविषयी सांगितले आहे.

'मी कोण?' हे शोधताना प्रथम मी काय नाही हे शोधले पाहिजे. ज्याचा ज्याचा मनुष्याला अभिमान असतो ती एक एक गोष्ट दूर झाली पाहिजे.

© www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

DECEMBER - 2014

अज्ञानप्रभवं सर्व ज्ञानेन प्रविलीयते।
संकल्पो विविधाः कर्ता विचारः सोऽयं ईदृशः॥ १७॥

या सर्वांची उत्पत्ति अज्ञानातून झाली आहे आणि शेवटी ज्ञान झाले की हे सर्व विलीन होऊन जाते. नाना प्रकारचे संकल्प हेच याचा कर्ता आहे. अशा प्रकारचा हा विचार आहे.

खरे तर ही सृष्टी निर्माणच झाली नाही. रज्जुवर सर्पाच्या भास व्हावा त्याचप्रमाणे हा सगळा भास आहे. ∴ त्यातून वेगवेगळ्या कल्पना होतात. आणि सृष्टी-उत्पत्तीचे वेगवेगळे सिद्धांत सांगतात.

रज्जुकडे सर्पाच्या दृष्टीने किंवा हाराच्या दृष्टीने किंवा पाण्याच्या प्रवाहाच्या दृष्टीने पहाता येते.

भसाच्या मुळाशी काय आहे हे माहिती नाही आणि म्हणूनच घोटाळे होतात.

अगा जे घडलेचि नाही, त्याची वार्ता पुससी काई?

© www.madhaveeraghuveer.com

एतयोर्यद उपादानं एकं सूक्ष्मं सदव्ययम् ।
यथैव मृदघटादीनां विचारः सोऽयं ईदृशः ॥१५॥

या दोन्हीचे उपादान एकच आहे जे सूक्ष्म, सद, अव्यय आहे. जसे घराचे मृद हे उपादानकारण आहे, तसाच हा विचार आहे.

परंतु ही उपमा देखील यथार्थ नाही. कारण ब्रह्म दिसते नाही परंतु भाती मात्र दिसते.

ज्ञानप्राप्ती — प्रत्यक्ष, उपमान, अनुमान, आप्तवाक्य।
प्रत्यक्ष हे चक्षुर्वैसत्यं असते Perception
उपमान - यात दुसऱ्या एखाद्या गोष्टीशी त्याचे साधर्म्य दाखवून पटवून दिले असते.
अनुमान - Inference — यत्र यत्र धूमो तत्रतत्र अग्निः ।
आप्तवाक्य -

SUNDAY 1

© www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

JANUARY - 2015

अहमेकोऽपि सूक्ष्मश्च ज्ञाता साक्षी सदव्ययः।
तदहं नात्र सन्देहो विचारः सोऽयं ईदृशः ॥१६॥

मी सुद्धा तसाच (सूक्ष्म, ज्ञाता, साक्षी, सत्, अव्यय असा) आहे. याविषयी कोणताही संदेह नाही - याबाबतचा विचार आत्मज्ञानाकडे नेणारा आहे.

जीव-ब्रह्म ऐक्य हे तत्त्वज्ञान सांगत सांगत आचार्य आपल्याला पायरी पायरीने नेतात.

© www.madhaveeraghuveer.com

२० सप्टेंबर २०१६

आत्मा विनिष्कलो ह्येको देहो बहुभिरावृत:।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमत: परम् ॥१७॥

आत्मा निरिन्द्रय (इंद्रिये नसलेला) आहे. देहाला खूप इंद्रिये आहेत. तरी सुद्धा लोकांना आत्मा व देह एकच आहेत असे वाटते. यापेक्षा अज्ञान ते कोणते?

आत्मा आणि देह एकच समजणे हेच सर्वात मोठे अज्ञान आहे. आत्मा काय आहे हे न जाणता केवळ देहाविषयी बोलणे हे टोकाचे अज्ञान आहे.

आत्मज्ञान हे सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे हे आधी पटायला हवे. इतर शास्त्रे अनात्म शास्त्रे आहेत हे समजायला हवे त्यासाठी धैर्य हवे.

तीन सत्ता आहेत - पारमार्थिक, व्यावहारिक, प्रातिभासिक जे सत्य आहे ते सत्य न मानता दुसऱ्या कशाला तरी खरे मानतो. रज्जु - सर्प.

देहाला मी म्हणणे हा अध्यास आहे.

देह या संज्ञेत तीन देह येतात - स्थूल, सूक्ष्म, कारण या तीनही देहांच्या पलीकडे जायला हवे. देहत्रयातीत ।

अखंड - त्यात कोणताही भेद नाही.

देश काल वस्तु. किंवा स्वगत, सजातीय, विजातीय आत्मा देहाच्या कोणत्याही गोष्टीने बाधित नाही आत्म्यात अभावाला जागा नाही.

प्रध्वंसाभाव
अन्योन्या भाव

मूळ ब्रह्माचे ज्ञान झाले की भास नाहीसा होतो. 'मी देह' असे म्हणणे हा आत्म्यावर केलेला आरोप आहे बहुभि: शब्दात पंचकोश येतात. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय

© www.madhaveeraghuveer.com

आत्मा नियामकश्चान्तर्देहो बाह्यो नियामकः।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमतः परम् ॥ १८॥

आत्मा हा नियामक, शास्ता (शरीराचा राजा) आहे, तो अंतरस्थ आहे. शरीरात राहतो. देह हे आत्म्याचे अधिकारक्षेत्र आहे. देह बाह्य आहे, दृश्य आहे. इतका स्पष्ट भेद असताना देखील जे या दोन्हीमध्ये साम्य पहातात त्यांचे काय बरे हे अज्ञान!

चालले शरीर कोणाचिये सत्ते?
एक शासक आणि दुसरा शासन करवून घेणारा आहे.
नियामक हा अव्यक्त, अदृश्य, सूक्ष्म आहे. — शास्ता
तर नियम्य हा दृश्य आहे, स्थूल आहे. — शासित
शासिताला शास्ता समजू नका.
आत बसलेला साक्षी आहे. कूटस्थ आहे.
तो जितका सूक्ष्म तितका व्यापक आहे.

आत्मा क्षेत्रज्ञ या देही क्षेत्र देहास वर्णिला।
अज्ञान काय त्यांचे हे ऐक्य त्यांच्यात पाहती॥

© www.madhaveeraghuveer.com

आत्मा ज्ञानमय: पुण्यो देहो मांसमयोऽशुचि:।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमाश्चर्यमत: परम्॥१८॥

आत्मा तेजस्वी पवित्र, देह रक्तमांसमय-अपवित्र असून
या दोन्हीमध्ये ऐक्य पहातात त्यांचे किती बरे अज्ञान!

ज्ञान विशुद्ध तो आत्मा, अस्थिमांसे घडे तनू।
अज्ञान काय त्याचे हे ऐक्य त्यांच्यात पाहती॥

आत्मा ज्ञानमय, पुण्य आहे. देह मांसमय, अपवित्र आहे.
मय याचा अर्थ जास्त प्रमाणात किंवा ठासून भरलेला!
हा देह सप्तधातुनी ठासून भरलेला आहे. परंतु
त्याच्यामध्ये ज्ञान नसते. ते ज्ञान चैतन्यामध्ये आहे.
सच्चिदानंद शुद्ध केवळ आत्मा! त्याला अविद्येची
उपाधि लागल्यामुळे तो शबल झाला. म्हणजे तितका
पवित्र राहिला नाही. तो ईश झाला.
त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी गुणातीत व्हायला हवे.
अज्ञान तर जायला हवेच पण ज्ञानही जायला हवे.
अष्टधा प्रकृतिचा देह अशुद्ध आहे. परंतु त्याच्या
पलीकडे पाहता यायला हवे.
एकनाथ महाराजांना महाराचे पोर अपवित्र वाटले नाही,
त्याला उचलून घेतले.
बाह्यशुचि महत्वाची, परंतु अंत:शुचि त्याहीपेक्षा महत्वाची!
अर्थात कशाचेच अवडंबर नको.
अन्तःशुचि: स शुचि:।

© www.madhaveeraghuveer.com

आत्मा प्रकाशकः स्वच्छो देहस्तामस उच्यते।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमाश्चर्यमतः परम्॥२०॥

आत्मा हा प्रकाशक आहे, स्वच्छ आहे देह हा तामस आहे या दोहांत जे साम्य बघतात त्यांचे काय बरे हे अज्ञान!

आत्मा प्रकाशक आहे. देह तमोगुणांनी युक्त आहे. तामस हा स्वभाव आहे. आणि तमोगुणप्रधान ही प्रकृतीची त्या त्या वेळची स्थिति आहे.

व्यपदेशस्तु भूयस्तः

प्रकृतिमध्ये ३ गुण समान आहेत. गुणसाम्य स्थिति.

तामस हा द्रव्यप्रधान आहे. Matter का महत्त्व!

राजस मध्ये क्रियाशक्ति प्रबळ आहे.

सात्त्विक मध्ये ज्ञानशक्ति प्रबळ आहे.

आत्म्यात द्रव्याचा काही संबंध नाही. तो निर्गुण निराकार आहे
जिथे द्रव्य आहे तिथे रंग, रूप, आकार आहे.

स्वच्छत्व आहे ते आत्म्याचे आहे.

अच्छ म्हणजे त्यात काहीही मिसळलेले नाही
आणि सु + अच्छ म्हणजे मूळ स्वरूपात जसेच्या तसे असणे.

मायेची उपाधि लागली की ते ईशतत्त्व
आणि अविद्येची उपाधि लागली की ते जीवतत्त्व होते.

© www.madhaveeraghuveer.com





| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

MARCH - 2015



आत्मा नित्यो हि सद्रूपो देहोऽनित्यो ह्यसन्मयः।
तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमतः परम्॥२१॥

8

आत्मा शाश्वत, चिरंतन आहे. देह नश्वर, अशाश्वत आहे. या दोहोत जे साम्य बघतात त्यांचे काय बरे हे अज्ञान!

9

10

11

12

1

2

3

SUNDAY 8

© www.madhaveeraghuveer.com

आत्मनस्तत् प्रकाशत्वं यत् पदार्थावभासनम्।
नाग्न्यादिदीप्तिवद् दीप्तिर्भवत्यान्ध्यं यतो निशि॥२२॥

सर्व वस्तु आत्मप्रकाशातच दृश्यमान होतात. आत्मप्रकाश हा अग्निप्रकाशाप्रमाणे नाही. अग्निप्रकाश हा येतो तसा जातो. अग्नि विझतो तेव्हा अंधार होतो. आत्मप्रकाश चिरंतन आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| MARCH - 2015 | M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | 30 | 31 | | | | | 1 |
| | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

देहोऽहमित्ययं मूढो धृत्वा तिष्ठत्यहो जना:।
ममायमित्यपि ज्ञात्वा घटद्रष्टेव सर्वदा॥ २३॥

मूर्ख माणूस 'देह म्हणजेच मी' असे मानून राहतो हे आश्चर्य आहे. वास्तविक त्याला माहिती असते की देह त्याचा आहे (पण त्याच्यापेक्षा निराळा) जसा घट आपणापेक्षा निराळा असे मानतो तितक्या तटस्थपणे देहाकडे बघता यायला हवे.

© www.madhaveeraghuveer.com

ब्रह्मैवाहं समः शान्तः सच्चिदानन्दलक्षणः।
नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधैः॥२४॥

असद्रूप देह म्हणजे मी नाही मी ब्रह्मच आहे सम, शांत, सत्, चित्, आनंद आहे. असे जे जाणणे म्हणजेच ज्ञान असे ज्ञानी लोक म्हणतात.

कैवल्यासंबंधी निश्चित ज्ञान हेच खरे आत्मज्ञान आहे.

ज्ञानादेव तु कैवल्यम्।

आपले खरे स्वरूप जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत ज्ञान नाही.

मूर्तिपूजा करताना प्राणप्रतिष्ठा करावी लागते

सत्, चित्, आनंद ही तीन लक्षणे वेगळी नाहीत.

या तिन्हींचे एकवटणे म्हणजे त्या ब्रह्माचे स्वरूपलक्षण आहे.

तटस्थ - तात्पुरते आहे. सदा मे समत्वं न मुक्तिर्न बन्धः।

ही अवस्था म्हणजे सम आहे.

सुखदुःखांचा उपरम होणे ही शांत स्थिति आहे.

या स्थितित कशामुळेही क्षोभ होत नाही. राग-लोभ नाहीत.

परंतु हे शाब्दिक ज्ञान झाले.

आत्मलक्षणात कधीही अनात्म गोष्टींचा विचार येणार नाही.

ज्याला कधीही खंडत्व नाही ते चैतन्य।

पूर्ण तृप्ती हे आनंदाचे लक्षण आहे

कारणाविना तृप्ति हा खरा आनंद आहे.

ज्ञानेंद्रियातून अनुकूल मिळते तेव्हा तृप्ती (किंवा सुख) मिळते.

सुखाला विरुद्ध शब्द दुःख आहे परंतु आनंदाच्या विरुद्ध नाही.

विषयानंदापेक्षा ब्रह्मानंद श्रेष्ठ आहे

© www.madhaveeraghuveer.com

निर्विकारो निराकारो निरवद्योऽहमव्ययः।
नाहं देही ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधैः ॥ २५ ॥

मी अव्यय (अविकारी) निराकार अक्षर असा आहे
मी देह नाही म्हणजेच ज्ञान असे ज्ञाते म्हणतात.

विकार म्हणजे परिणाम. दुधाचे दही हा परिणाम आहे. विकार्य
मात्र लाकडाची खुर्ची हे विकार्य नाही.
उत्पाद्य, आप्य, विकार्य, संस्कार्य हे कर्माचे प्रकार आहेत.
आप्य - कोठतरी पोहोचणे किंवा प्राप्त झाले किंवा
हातात आले की कार्य संपले
संस्कार्य : डाग नाहीसा करून त्याचे मूळ स्वरूप
स्पष्ट करणे त्यासाठी आधी ते गुण ओळखता
यायला हवे. मुलांवर संस्कार करताना त्यांच्यातील
मूळ गुण ओळखून अनावश्यक गोष्टी काढून टाकायला
हव्यात. त्यासाठी Discipline हवे
उत्पाद्य - आकार, नाव बदलणे खुर्ची, अलंकार, घर बनवणे
यात मूळ द्रव्य नाहीसे होत नाही.
विकार्य - कशाशी तरी संयोग आल्याने, क्रिया केल्याने परिणत होते. दही
ब्रह्मापासून कोणताच विकार नाही :- निर्विकार।
आत्मा कधीही परिणाम पावत नाही. सुख-दुःख हे आत्म्याचे विकार
नाहीत. निराकार म्हणजे आकार नाही आकाशाला आकार नाही
आत्मा अमूर्त आहे. मूर्तस्वरूप म्हणजे पंचीकृत झाले
जसजसे स्थूल होत जाते तसतसा आकार येत जातो
त्याला स्थूलस्वरूप आलेले नाही ∴ तो अव्यक्त आहे.
केवळ अनुमानाच्या कक्षेत आले की त्याला वेगवेगळी नावे दिली
जातात — नादब्रह्म, शब्दब्रह्म, अन्नब्रह्म
निरवद्य - ज्याबद्दल काही बोलता येत नाही दोष देता येत नाही असे
यात काही मिसळता येत नाही किंवा त्यातून काही काढता येत नाही
दोषरहितत्व हे पूर्णत्व असते. — नरेंद्र मोदी

© www.madhaveeraghuveer.com

ऑक्टोबर
२७ ~~ऑक्टो~~ २०१६

निरामयो निराभासो निर्विकल्पोऽहमाततः।
नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधैः॥२६॥

मी निरामय, निराभास, निर्विकल्प सर्वव्यापी आहे.
मी असद् रूप देह नाही. याला बुद्धिमान ज्ञान म्हणतात.

निरामय- व्याधिरहित, स्वस्थ, प्रसन्न
स्वस्थ- स्वे स्थितः इति। निराभास- आभास नसलेला.
सर्पाचा भास रज्जुवर होतो. त्यात साम्य असल्याने भास होतो. अर्थात्च साम्य आहे म्हणजे द्वैत असले पाहिजे. म्हणजेच त्याच्यासारखे दुसरे काहीतरी हवे.
इथे दुसरे काहीच नाही. ∴ तो निराभास आहे.
तो एकमात्र आहे, ज्ञानपूर्ण आहे. इथे अज्ञान बिलकुल नाही म्हणून तिथे भास नाही.
निर्विकल्प - संशय, अनिश्चितता नाही.
संकल्प - सम्यक् कल्पना ⟷ विकल्प - विपरीत कल्पना
ज्याच्या मनात संशय असतो तो परिपूर्ण नाही.
संशयात्मा विनश्यति असे गीतावचन आहे. उपदेशाच्या अखेरीस अर्जुन म्हणतो — स्थितोऽस्मि गतसन्देहः।
आपल्याबद्दल अनिश्चितपणा नाही, तो साक्षीरूप आहे.
आपण साक्षीरूप नसतो ∴ आपल्या मनात विकल्प येतो.
कधी कधी परिचित व्यक्तिबद्दलही विकल्प वाटतो.
देह हा कधी साक्षीरूप (निपक्षपाती) नसतो)
मनावर बुद्धिचा अंकुश हवा. आत्मदीप तेवत रहायला हवा.
परमेश्वर कधी कोपत नाही किंवा प्रसन्न होत नाही.
म्हणूनच भगवंत म्हणतात. न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।
अहम् आततः - मी व्यापून आहे. तन् - पसरणे.
देह आमययुक्त आहे. भासयुक्त आहे. संशययुक्त आहे.

© www.madhaveeraghuveer.com

निर्गुणो निष्क्रियो नित्यो नित्यमुक्तोऽहमच्युतः।
नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधैः ॥२७॥

मी निर्गुण, निष्क्रिय, नित्य, नित्यमुक्त, अच्युत आहे मी असद् रूप देह नाही.

निर्गुण - गुणातीत, त्रिगुण नाहीत असा तो पुरुष!
त्रिगुणात्मिका - गुणांनी बांधलेली अशी ती प्रकृति!

प्रथम गुणसाम्यस्थिती होती. हे बिघडल्याने कोणता तरी गुण प्रबळ झाला, व सृष्टि उत्पत्ति झाली.

आध्यात्मिक श्रवण करताना सत्वगुण प्रबळ असतो. तेच रजोगुण वाढला की हालचाली वाढतात. ते पाहून दुसऱ्यांचा तमोगुण वाढू शकतो.

ज्ञानेश्वरांचा रजोगुण वाढला तेव्हा ते झोपडीत गेले व त्यांनी कोंडून घेतले. परंतु मुक्ताईच्या मनात सत्वगुण होता. आपुलकी, प्रेम होते ∴ तिने ताटीचे अभंग रचले. ही सर्व घटना साक्षीभावाने पहाणारे निवृत्तिनाथ मात्र स्वस्थ होते. ज्ञान + भक्ति = मुक्ताई.

साम्यावस्थेत काहीही घडत नाही ∴ तो निष्क्रिय असतो. परंतु निष्क्रिय म्हणजे क्रियाशून्यता नाही. तर तो सर्व करून शकतो आहे. माया सर्व करते. मायेचे स्फुरण त्यालाच झाले. त्याला प्रेरणा झाली. कारण (एकाकी न रमते / एकोऽहं बहु स्याम्)

सृष्टी चालण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या त्या तिच्याकडे (मायेकडे) सुपूर्द केल्या. जेव्हा त्याचे मन या खेळात रमणार नाही तेव्हा तो हा खेळ आवरून घेतो.

सोऽहम् ही अनुभूति शिवकृत तर देह म्हणजे मी ही अनुभूति जीवकृत आहे. नित्य - कालातीत, रूपांतररहित, सत्स्वरूप

नित्यमुक्त - जसा तो सत् आहे तसा सदैव मुक्तच आहे. सच्चिदानंद हेच त्याचे मुक्तरूप आहे. त्याला उपाधि नाही म्हणून तो बद्ध नाही. ब्रह्मा, विष्णु, महेश हे बद्ध आहेत. शबल ब्रह्मालाही बंध आहे. परंतु परब्रह्म नित्यमुक्त आहे. शबल ब्रह्म मायेच्या आधीन आहे परंतु परब्रह्माची सत्ता मायेवर चालते. ती नसेल तर शव आणि शिव यात अंतर नाही.

स्तोत्र - १०

निर्मलो निश्चलोऽनन्तः शुद्धोऽहमजरोऽमरः।
नाहं देहो ह्यसद्रूपो ज्ञानमित्युच्यते बुधैः॥२८॥

मी निर्मळ, अचळ, अमर्याद, पावन, अविकारी आणि अजरामर आहे.

निर्मळ - जिथे मलिन सत्व नाही. केवळ शुद्ध सत्व आहे. हा रजो-तमो गुणांमुळे मलिन होत नाही.

निश्चल - हा गतिरहित असून सर्वव्यापी आहे.

अनंत - याला नाश नाही, अंत नाही. उत्पत्ति-स्थिति नाही.

शुद्ध म्हणजे असंग आहे. याला कशाची उपाधि नाही.

अजर - म्हातारपण नसलेला तर अमर - मृत्यु नसलेला.

ज्ञानविचार हा २२ लक्षणांच्या रूपाने सांगितला आहे.

सत् - अव्यय, नित्य, शाश्वत, अनंत }
चित् - निरवद्य, निराभास, नित्यमुक्त, शुद्ध } ८ लक्षणे

इतर सर्व १४ लक्षणे सबलापेक्षा श्रेष्ठत्व सिद्ध करणारी आहेत. १. निर्मल २. निश्चल ३. अजर ४. अमर ५. निर्गुण ६. निष्क्रिय ७. ~~[illegible]~~ अच्युत ८ निरामय ९ निर्विकल्प. १० निराकार ११ निर्विकार १२ समः १३ शान्तः

© www.madhavprabhuveer.com

स्वदेहे शोभनं सन्तं पुरुषाख्यं च सम्मतम् ।
किं मूर्ख शून्यमात्मानं देहातीतं करोषि भो ॥२९॥

स्वतःच्या शरीरात भद्र, सत्य, ज्याला पुरुष म्हटले जाते, जो मान्य आहे असा आत्मा असताना तू त्याला देहापलीकडे शून्य कसे ठरवतोस ?

गुरुंच्या समोर बसलेला शिष्य अपरोक्षानुभूतिसाठी (उत्सुक असा) बसला आहे. त्याने ज्ञानाची विशिष्ट पातळी गाठली असणे अपेक्षित आहे. अशा वेळी त्याच्या अज्ञानाची परिसीमा दाखवण्यासाठी आचार्य 'मूर्ख' शब्द वापरतात. एरवी आचार्य मूढ शब्दाचा उपयोग करतात. परंतु देहाच्या पलीकडे आत्म्याला शून्य समजणाऱ्या शिष्याची निर्भत्सना करतात.

करोषि याचा अर्थ ठरवून टाकतोस असा आहे. पूर्णाच्या उलट शून्य आहे. बुद्धांचा शून्यवाद आचार्यांचा अद्वैतवाद आहे (पूर्ण)

पुरि शेते इति पुरुषः ।

स्थानावर Identity ठरत नाही.
भारतात राहणारा तो भारतीय होत नाही.

आत्मानं देहातीतं शून्यं मन्यसे (करोषि)

पंचभूत समवायी आत्मा आहे.

यावत् कण्ठगताः न प्राणाः तावत् चिकित्सेत् ।
जीवाला शिवत्व आहे तोवर चिकित्सा करावी.
आत्मा – ब्रह्म – पूर्ण असा सिद्धांत आहे.

वर्तुळ नेहमी पूर्ण असते तर रेषा अपूर्ण असते
ब्रह्मांडामध्ये लयातच उत्पत्ती आणि उत्पत्तीतच लय आहे.
जे सत् आहे ते पूर्ण आहे, तोच आत्मा आहे.

शून्य व पूर्ण यात भेद आहे
दोष असणे म्हणजे अपूर्ण
निरवद्य – दोषरहित

© www.madhaveeraghuveer.com

18 FEBRUARY 2015 WEDNESDAY

(049-316) WK 08

स्वात्मानं शृणु मूर्ख त्वं श्रुत्या युक्त्या च पूरुषम्।
देहातीतं सदाकारं सुदुर्दर्शं भवादृशैः॥२७॥

मूर्ख, त्वं श्रुत्या युक्त्या च स्वात्मानं पुरुषं शृणु।

स्वतःच्या आत्म्याविषयी / पुरुषाबद्दल श्रवण कर
श्रुति - वेदांत आणि युक्ति - समन्वय.
तुझ्यासारख्यांना त्याची अनुभूति येणे कठीण आहे.
देहापलीकडे परन्तु सद्रूप असणाऱ्या आत्म्याचा
अनुभव येणे अवघड आहे.

© www.madhaveeraghuveer.com

देही - देह भिन्नता लक्षण - ३१ ते ४०

अहं शब्देन विख्यात एक एव स्थित: पर: |
स्थूलस्त्वनेकतां प्राप्त: कथं स्यात् देहक: पुमान् ||३१||

मी या शब्दाने प्रसिद्ध असलेला श्रेष्ठ असा एकमेव आत्मा आहे. पण स्थूलत्वामुळे - मूर्तिमत्त्वामुळे अनेकता प्राप्त झालेला हा देह पुरुष कसा असेल ?

पुरुष हा एकच, स्थिर आहे, श्रेष्ठ आहे. देह अनेक आहेत. परंतु पुरुष मात्र एक आणि केवळ एकच आहे. पुरुष मूर्तिमान, स्थूल नाही. देह मात्र स्थूल आहे, दिसतो. एवढा स्पष्ट फरक दोघांमध्ये आहे.

इथे देहाची तुच्छता स्पष्ट करण्यासाठी देहक असा शब्द मुद्दाम वापरला आहे.

देह - देहक, बाल - बालक, युवा - युवक, मम - ममका:

केवळ देहधारीलाच 'मी मी' असे वाटत असते.

जेव्हा तो पूर्णत्वाला पोहोचतो तेव्हा त्याच्या तोंडून 'मी' हा शब्द कधीच येत नाही.

'अहं ब्रह्मास्मि' ही अवस्था अनुभवायची असते. म्हणायची नसते.

अहं द्रष्टतया सिद्धो देहो दृश्यतया स्थित: |
ममायमिति निर्देशात् कथं स्यात् देहक: पुमान् ||३२||
(ममायमिति)

मी हा द्रष्टा म्हणून तर देह हा दृश्य म्हणून सिद्ध असताना 'माझा हा' असा त्याचा उल्लेख होतो तो देह आत्मा कसा असू शकेल ?

मम व अयम् असे देहाला संबोधता येते.

द्रष्टा आणि दृश्य असा भेद स्पष्ट आहे.

© www.madhavkeeraghuveer.com

अहं विकारहीनस्तु देहो नित्यं विकारवान् ।
इति प्रतीयते साक्षात् कथं स्यात् देहकः पुमान् ॥३३॥

मी अविकारी परंतु देह हा नेहमीच विकारी असतो हे प्रत्यक्ष प्रतीत होत असताना देहाला आत्मा कसे म्हणणार?

इथे विकार हा शब्द परिणाम या अर्थाने घ्यायचा.
गाय - दूध - दही - ताक - लोणी - तूप
हे सर्व विकार आहेत.

एकदा पुढच्या स्थितित गेल्यानंतर पुन्हा मागे येता येत नाही, त्याला विकार असे म्हणतात.
मागे न येणे म्हणजे विकार।
बाल्यावस्थेतून तारुण्यात जाता येते परंतु पुन्हा बाल्यावस्था प्राप्त करून घेता येत नाही म्हणून तारुण्य हा विकारच आहे.
विकार व व्याधि मध्ये अंतर आहे.
व्याधि बरी झाल्यानंतर मूळ अवस्था प्राप्त होऊ शकते. आजारपणात कमी झालेले वजन किंवा शरीरात झालेला बिघाड दुरुस्त होऊ शकतो. व पुन्हा पूर्वीची अवस्था प्राप्त होते. व्याधिची चिकित्सा करून औषधोपचार करता येतात परंतु विकाराची चिकित्सा करता येत नाही.
मलेरिया व्याधि आहे परंतु मधुमेह विकार आहे.
जागृति - स्वप्न - सुषुप्ति - हे विकार परिणत होतात.

यस्मात् परमिति श्रुत्या तया पुरुषलक्षणम् ।
विनिर्णीतं विमूढेन कथं स्यात् देहकः पुमान् ॥३४॥

ज्याअर्थी परम हे पुरुषलक्षण सर्वांच्या पलीकडचे (सर्वश्रेष्ठ) आहे असे श्रुति सुद्धा सांगतात. असे असताना अज्ञानी लोकांनी केलेला निर्णय खरा कसा मानणार?

© www.madhaveeraghuveer.com

इथे अज्ञानी म्हणजे देहाला सर्वस्व मानणारे चार्वाक आदि.
यावज्जीवं सुखं जीवेत्, ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ॥
देह श्रेष्ठ आहे हे निश्चित परंतु आत्म्यापेक्षा श्रेष्ठ नाही.
देहाला साधनमूल्य निश्चितपणे आहे परंतु अंतिम मूल्य नाही.
देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ॥
असे मानणारे संत फारच विरळा असतात.
इतर सर्वजण ऐहिकाच्या मागे लागतात. म्हणजे ते देहाला चिकटून असतात. देहाला सर्वस्व मानतात.
हा देहाबद्दलचा बंध गेला पाहिजे. आसक्ति सरली पाहिजे.
आजकाल ठिकठिकाणी सुरु असणारा व्यक्तिविकासाचा कार्यक्रम हा देहाला अनुसरुन असतो. देहबोली Body language किंवा चालणे बोलणे शिकवतात परंतु खरा व्यक्तिमत्व विकास म्हणजे आत्म्याचे फुलणे असायला हवे.
आत्मज्योति पूर्णपणे विकसित व्हायला हवी.
त्यासाठी त्यावरची धूळ काढून टाकायला हवी.
अविवेकाची काजळी

आद्य शंकराचार्य हे पूर्ण विकसित व्यक्तिमत्व होते.
आपल्या मूळ स्वरुपावर अनेक कोशांचे आवरण आहे.
ते काढून टाकून Presentable व्हायचे
जिथे आत्मतेज चकाकते तिथे बाकी सार्‍या ऐहिक, डामडौलाच्या, दिखाव्याच्या गोष्टी फिक्या पडतात.
कावळ्यांच्या काककलारात राजहंस शोभून दिसतो



© www.madhavaeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

JANUARY · 2015

सर्वं पुरुष एवेति सूक्ते पुरुषसंज्ञिते।
अप्युच्यते यतः श्रुत्या कथं स्यात् देहकः पुमान्॥३५॥

इथे आचार्य श्रुतींचे आणि पुरुषसूक्तातील संदर्भ देतात. हे सर्व ब्रह्मांड पुरुषच आहे (पुरुषाचेच दृश्य स्वरूप आहे) तोच भूत, भविष्य आणि वर्तमान आहे. तोच सुखनिधान आहे. त्यानेच हे विश्वरूप धारण केलेले आहे. ज्यामध्ये असंख्य जीव आपली कर्मफले भोगण्यासाठी जन्म घेतात.

"सर्व पुरुष एवेदं" सूक्ती पुरुष वर्णिला।
असे सर्व जगद्व्यापी कसा पुरुष देह हा॥३५॥

असङ्गः पुरुषः प्रोक्तो बृहदारण्यकेऽपि च।
अनन्तमलसंश्लिष्टः कथं स्यात् देहकः पुमान्॥३६॥

बृहदारण्यकात म्हटले आहे की हा पुरुष असंग आहे असे जर आहे तर अनेक मल मांसांनी आणि अशुद्धतेने भरलेल्या देहाला पुरुष कसे म्हणावे?

असे पुरुष हा नित्य असंगी बृहदारण्यक बोले।
देह असे अपवित्र सदाचा पुरुष कसा त्या बोले॥

तत्रैव च समाख्यातः स्वयंज्योतिर्हि पुरुषः।
जडः परप्रकाश्योऽसौ कथं स्यात् देहकः पुमान्॥३७॥

त्याच उपनिषदात सांगितले आहे की पुरुष हा स्वयंप्रकाशी आहे. म्हणून जर देह जड आणि परप्रकाशी आहे तर तो पुरुष कसा काय असू शकेल? बृहदारण्यक– १.४.९

© www.madhaveeraghuveer.com

प्रोक्तोडपि कर्मकाण्डेन ह्यात्मा देहात् विलक्षणम्।
नित्यश्च तत्फलं भुङ्क्ते देहपातात् अनन्तरम्॥३८॥

कर्मकांडानेही आत्मा हा देहाहून निराळा आहे असे म्हटले आहे. कारण देहपातानंतरही आत्म्याला या जन्मात झालेल्या कर्मांची फळे भोगावी लागतात.

षड्दर्शन - सांख्य, योग, न्याय, वैशेषिक
पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा
↓
यज्ञयाग, कर्मकांड.

या सर्व कर्मकांडांचा प्रधान हेतू म्हणजे स्वर्गप्राप्ति हाच होता. परंतु स्वर्गात देखील कायमचे वास्तव्य नाही. पुण्य सरले की पुन्हा मर्त्यलोकात परतावे लागते. जोवर एखाद्या व्यक्तीचे स्मरण अजूनही लोक आदराने करत असतील तोवर पुण्यसंचय टिकून आहे असे समजावे. पृथ्वीवरील लोकांच्या स्मरणातून ती व्यक्ती पुसली जाणे म्हणजेच पुण्यक्षय होणे आहे.

कर्मकांडही म्हणते आत्मा देहाहून निराळा।
देह टाकल्यानंतर भोगी आत्मा कर्मफळाला॥

यज्ञयाग, कर्मकांड हे सर्व गौण आहे.

लिङ्गं चानेकसंयुक्तं चलं दृश्यं विकारि च।
अव्यापकमसद्रूपं तत्कथं स्यात् पुमान्॥३९॥

सूक्ष्म जरी देह असला तरी तो इंद्रियांच्या माध्यमातून व्यक्त होतो. तो विकारी, मर्यादायुक्त नाशवंत आहे. तो पुरुष कसा बरे असेल?

तो अनेकांशी संयुक्त आहे. त्याची लक्षणे चल, दृश्य, विकारी, अव्यापक आणि असद्रूप असताना देह म्हणजे पुरुष कसा असेल?

©www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

JANUARY 2015

इथे चल म्हणजे गतिमान। देह १८ तत्त्वांचा बनला आहे.
स्थूल देह दृश्य म्हणजे दिसतो. मूर्तिमंत आहे.
सूक्ष्म देह सुध्दा असाच विकारी आहे.
स्थूल मांसमय तर सूक्ष्म वासनामय आहे.
परंतु दोन्ही पांचभौतिक आहेत.
स्थूल देहात पंचीकरण झालेले आहे तर सूक्ष्म देहात पंचीकरण झालेले नाही.
सूक्ष्म देह प्रत्यक्ष दिसत नसला तरी तो द्रष्टा नाही हे निश्चित आणि म्हणून तो दृश्य आहे.
जेव्हा तो आत्म्याशी संलग्न असतो तेव्हा तो द्रष्टा असतो. एरवी तो दृश्यच असतो

एवं देहद्वयात् अन्य आत्मा पुरुष ईश्वरः।
सर्वात्मा सर्वरूपश्च सर्वातीतो अहमव्ययः॥७८॥

अशा तऱ्हेने दोन्ही (स्थूल, सूक्ष्म) देहांपासून निराळा असा हा जो 'मी, आत्मा, पुरुष, ईश्वर' हा सर्वात्मा, सर्वरूप, सर्वांच्या पलीकडचा अव्यय आहे.
हा सर्वश्रेष्ठ आहे.

इत्यात्मदेहभागेन प्रपंचस्यैव सत्यता।
यथोक्ता तर्कशास्त्रेण ततः किं पुरुषार्थता॥७९॥

तर्कशास्त्राने जसे सांगितले त्याप्रमाणे देह आणि आत्मा यातील भिन्नता करून चुकते, त्यामुळे प्रपंच मिथ्या आहे हे सत्य समजते. त्यानंतर मग पुरुषार्थता ती कोणती?
मी म्हणजे देह नाही हे सत्य उमगते. चारही पुरुषार्थ महत्त्वाचे असले तरी पहिल्या तीनचे अनात्मरूप स्पष्ट होते. [धर्म - अर्थ - काम - मोक्ष] आणि मोक्षाची महती पटते.
ज्ञानादेव तु कैवल्यम्। केवळ मोक्षप्राप्तिच साधायची.
धर्मावर अधिष्ठित धर्म, काम असतील तर मोक्षप्राप्ति होते.

© www.madhavvaraghuveer.com

## प्रकरण - ७ वे
## देह भेद कथन -

इत्यात्मदेहभेदेन देहात्मत्वं निवारितम्।
इदानीं देहभेदस्य ह्यसत्त्वं स्फुटमुच्यते॥४२॥

अशा प्रकारे आत्मा आणि देह यातील भेदामुळे देहाला आत्मा समजणे या कल्पनेचे खंडन झाले. पण आता देहभेदाचेही खोटेपणा - मिथ्यत्व स्पष्ट करुन सांगितले आहे.

एकदाच भेद दाखविल्यावर आचार्य वारंवार देह खोटा आहे हे स्पष्ट करतात.

देह वेगळे परंतु आत्मा एक आहे. देहभिन्नता असली तरी ते सर्व मिथ्या आहे.

चैतन्यस्य एकरुपत्वात् भेदो युक्तो न कर्हिचित्।
जीवत्वं च मृषा ज्ञेयं रज्जौ सर्पग्रहो यथा॥४३॥

चैतन्य हे एकरुपच असल्याने त्या संबंधात भेद दिसणे कधीही योग्य नाही. जीवत्वाच्या ठिकाणी सुद्धा असेच मिथ्यत्व असते जसे रज्जुच्या ठिकाणी साप आहे असे वाटते.

रज्जु एकच असला तरी कल्पना अनेक असतात. हार, पाण्याचा ओहोळ इ.
ग्रह - भ्रम, भ्रांति / चैतन्य - सत्, देह - असत्

रज्ज्वज्ञानात् क्षणेनैव यद्वत् रज्जुर्हि सर्पिणी।
भाति तद्वत् चितिः साक्षात् विश्वाकारेण

रज्जु आहे हे न कळल्यामुळे त्याप्रमाणे दोरी सर्पाकार भासते त्याप्रमाणे चैतन्यालाही (चिति) आपण विश्वाकार समजतो. अज्ञान असताना द्वैत भासते, तेच ज्ञान होताच अद्वैत आहे हे कळते. ज्ञान होताच वेगळेपणा सरतो, एकाचा अनुभव येतो. चैतन्य व जगत् हे दोन भासत असले तरी असत नाहीत.

© www.madhaveeraghuveer.com

उपादानं प्रपञ्चस्य ब्रह्मणो अन्यत न विद्यते।
तस्मात् सर्व प्रपञ्चोऽयं ब्रह्म एव अस्ति न चेतरम्॥
॥४५॥

प्रपंचाचे उपादान कारण ब्रह्माशिवाय दुसरे नाही. त्यामुळे हा सर्व प्रपंच ब्रह्मच आहे दुसरे काहीच नाही. नाम, रूप, आकार यामुळे जर घटाला मातीपेक्षा वेगळे मानणे ही चूक ठरेल. त्याप्रमाणे हा प्रपंच (सृष्टी) ब्रह्मच आहे, दुसरे काही नाही.

कार्यकारण भाव —

~~कार्य~~ कारणच कार्यरूपाने प्रकट होत जाते. कार्य नाहीसे झाले तरी कारण नाहीसे होत नाही. घट नाहीसा झाला तरी माती नाहीशी होत नाही. ब्रह्मावर झालेल्या भासामुळे भिन्नता दिसते.

नामरूपात अडकून न पडता मूळ रूपाकडे जायचे आहे. चैतन्य प्रखर तेजस्वी आहे. शुद्ध अंतःकरणाने पाहिले तर Waves मनाला भिडतात.

सच्चिदानंद ब्रह्माचा प्रत्यय येतो.

सर्व विश्व केवळ ब्रह्मच आहे, दुसरे काही नाही.

सर्व विश्व म्हणजे ब्रह्माच्या अधिष्ठानावर झालेला भास आहे. एव इति ब्रह्म!

व्याप्य व्यापकता मिथ्या सर्वं आत्मेति शासनात्।
इति ज्ञाते परे तत्त्वे भेदस्य अवसरः कुतः॥४६॥

सर्वत्र जर आत्म्याचीच सत्ता असेल तर व्याप्य आणि व्यापक हा भेदही मिथ्या आहे
परमात्म्याबद्दलचे हे ज्ञान झाल्यानंतर भेदबुद्धीला अवसर आहेच कुठे!

एक व्यापणारा व दुसरा व्यापले जाणारा अशा वेगवेगळ्या सत्ता आपल्याला भासतात. परंतु सर्वत्र त्याचीच सत्ता असेल तर भेद कुठून असणार?

© www.madhaveeraghuveer.com

सर्वसाधारणपणे व्यवहारातही जे मोठे असते त्याची सर्वांवर सत्ता असते ब्रह्म म्हणजे बृहत आणि बृहत म्हणजे मोठे. ब्रह्म सर्वात मोठे आहे. त्याच्याशिवाय दुसरे काहीच नाही इतके ते मोठे आहे. ते आकाशापेक्षा मोठे आहे. आकाश देखील त्याच्यात सामावले आहे.

१. पारमार्थिक सत्ता
२. व्यावहारिक सत्ता
३. प्रातिभासिक सत्ता

ब्रह्म आहे म्हणून या तीनही सत्ता आहेत.

श्रुत्या निवारितं न्यूनं नानात्वं स्वमुखेन हि।
कथं भासो भवेदन्यः स्थिते चाद्वयकारणे ॥७०॥

श्रुतिंनी स्वतःच्या मुखानेच या विविधतेचे निवारण केल्यानंतर अन्याचा भास कसा व्हावा? कारण अद्वैत हे सदैव त्या ठिकाणी असणारच.

२४ नोव्हेंबर २०१६

दोषोऽपि विहितः श्रुत्या मृत्योर्मृत्युं स गच्छति।
इह पश्यति नानात्वं मायया वञ्चितो नरः ॥७१॥



अन्वय - श्रुत्या दोषो अपि विहितः मायया वञ्चितः नरः इह नानात्वं पश्यति स मृत्योः मृत्यु गच्छति।
श्रुतिंनी यातील दोष स्पष्ट करून सुद्धा मायेने फसवला गेलेला मनुष्य इथे जो भेद पहातो त्याला मृत्युकडून मृत्युकडे अशी गती मिळते.
द्वैतामुळे विविधता दिसते.
ब्रह्म सत्य हे समजल्याखेरीज वासना सरत नाहीत. वासना चांगल्या असल्या तर चांगल्या कुळात जन्म मिळतो

© www.madhaveeraghulveer.com

शुचीनां श्रीमतां गेहे------
अशा कुटुंबात जन्म मिळतो.
म्हणजे देहाला मरण आले तरी मुक्ती मिळत नाही

ब्रह्मणि सर्वभूतानि जायन्ते परमात्मनः।
तस्मात् एतानि ब्रह्मैव भवन्ति इति अवधारयेत्॥
॥४९॥

परमात्मा ब्रह्मापासून सर्व भूते/प्राणिमात्र निर्माण होतात.
म्हणून ही ब्रह्मच होतात हे लक्षात ठेवावे.
माणसापासून माणूसच जन्माला येतो.
मुंगीपासून मुंगीच जन्माला येते.
झाडापासून झाडच जन्माला येते.
चार योनी आहेत. स्वेदज, अंडज, उद्भिज, जरायुज।
ब्रह्म मूलमिदं जगत्।
नानात्व हे नामरूपाने येते.
भेदबुद्धीचे मूळ नामरूप आहे.
नामरूप ज्याच्यावर आधारित आहे ते मूळ शोधले की मिथ्या कल्पनांचा निरास होतो.
आपण सारी माणसेच आहोत या भावनेतून क्षमाशीलता वाढते. चुका क्षम्य ठरतात. दुसऱ्याचा आनंद माझा वाटायला लागतो. ट्रेनमधून जाताना धक्के खाताना मद, नष्ट होतो — कपडे, दागिने, हुद्दा विसरला जातो.

ब्रह्मैव सर्वनामानि रूपाणि विविधानि च।
कर्माण्यपि समग्राणि बिभर्ति इति ॥५०॥

सर्व नामे, विभिन्न रूपे ही ब्रह्मच आहेत. सर्व कर्मसुद्धा ब्रह्म च आहेत असे श्रुति स्पष्ट करते.
या ब्रह्माच्या आधारावर परिस्थिती, नामरूपेन मिळता येत

©www.madhaveeraghuveer.com

जगाची ओळख नामरूपाने होते. नामकरण विधी नाव देतो ते नक्की कोणाला? तर देहाला, कारण तो दिसतो. परंतु उपाधीला नाव दिले तरी ते चिकटते आत्म्याला, कारण मृत्युनंतर नाव टिकून राहते. जे कार्य सच्चिदानंदाला धरून राहिले ते टिकून राहते.

नामरूपाचे आरोप अजातत्वावर झालेले असतात. रज्जुवर हार, सर्प, जलप्रवाहाचा भास होतो.

जो जो जन्माला आला तो खरे तर अजन्माच आहे. आपल्या मनातील अपेक्षा त्याच्यावर लादल्या जातात.

नामरूप हे नेहमीच मिथ्या असते. आपण शोधत असतो ते सच्चिदानंद रूप!

नाम घेताना त्याच्याशी एकरूप व्हायला हवे. माझ्या जीवनात ते शिवतत्व यायला हवे. तर ते नामच तुम्हाला तारून नेईल. अर्थात त्यामध्ये भाव पुरेपूर हवा.

नुसते यांत्रिक नाम घेऊन गौण फळ मिळेल.

१३ कोटि नामजप झाला तर रामाचे साक्षात दर्शन घडते असे म्हणतात. त्याप्रमाणे एक भक्त गोंदवलेकर महाराजांकडे आला. माझा १३ कोटि नामजप झाला परंतु दर्शन झाले नाही. तेव्हा महाराज त्याला म्हणाले तू पासबुक दाखवतोस, परंतु चेकबुक कुठे आहे? तुझ्या नामस्मरणाचे पुण्य तू वेळोवेळी

★ खर्च केल्यामुळे फारशी शिल्लक उरली नाही. - संकटे, आजारपण याचाच अर्थ नामाच्या बदल्यात काही मागू नये.

बाळाचे नामकरण हा संस्कार आहे, नुसते बारसे नाही.

ब्रह्माचे नाम, रूप, कर्म असे काही बोलता येत नाही.

नामधारी पंथ - गुरुदेव रानडे / भाऊसाहेब उमदीकर

© www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

FEBRUARY - 2015

सुवर्णात् जायमानस्य सुवर्णत्वं च शाश्वतम्।
ब्रह्मणो जायमानस्य ब्रह्मत्वं च तथा भवेत् ॥५१॥

सुवर्णापासून उत्पन्न झालेल्या सर्व गोष्टींमध्ये सुवर्णत्व हे नेहमीच (शाश्वत) असते. त्याचप्रमाणे ब्रह्मापासून निर्माण झालेल्या सर्व गोष्टींमध्ये (प्रत्येक) ब्रह्मत्व असतेच असते.

उपादान कारण हे ~~[illegible]~~ कार्यात असतेच.

ब्रह्म शाश्वत आहे परंतु त्यापासून उत्पन्न झालेल्या प्रपंचाला शाश्वतता नाही.

प्रपंचात ब्रह्म आहे परंतु ब्रह्माची शाश्वतता नाही.

जीवामध्ये ब्रह्मतत्वाची व्यक्तता दिसून येत नाही. जीवाची व ब्रह्मतत्वाची सांगड आहे.

परंतु घटाकाश म्हटल्याने घटाची मर्यादा येते खरे तर आकाशाला मर्यादा नाही. त्याचप्रमाणे प्रपंचाला शाश्वतता नाही. ब्रह्माशी एकरूप झालात तर तुम्ही शाश्वत झालात; परंतु प्रपंचाशी " " " " अशाश्वत आहात.

स्वल्पमप्यन्तरं कृत्वा जीवात्म परमात्मनः।
यास्तिष्ठति मूढात्मा भयं तस्यापि भाषितम् ॥५२॥

जीवात्मा व परमात्मा यांच्यामध्ये अगदी थोडासुध्दा भेद जो पाहतो, असे जो मानतो त्याला भय सांगितले आहे.

म्हणजे मी जीव आहे व तो परमात्मा आहे मी भक्त व तो भगवंत आहे असे मानतो म्हणून जीवात्मस्वरूप आल्यावर जो अज्ञानीच आहे अशाला भय सांगितले आहे. द्वितीयात् वै भयं भवति।

जिथे दुसरेपण असते तिथे भय असतेच मृत्युभय तर सर्वनाच आहे परंतु

इशेच्छया हि सदा वर्तता: नस्य भयं नास्ति।
→ [illegible] तो श्री तुम्हे जो अच्छा वही मेरी इच्छा॥

यत्राज्ञानात् भवेत् द्वैतं इतरस्तत्र पश्यति ।
आत्मत्वेन यदा सर्वं नेतरस्तत्र चाण्वपि ॥५३॥

देह, रूप, लिंग यांचा विचार केला असता द्वैत जाणवते, भय वाटते. परंतु जेव्हा आत्मतत्त्वाचा विचार केला जातो तेव्हा भय सरून जाते.

दुसरे समजणे सोडून दिले तर भीती संपून जाते. कणभर, मणभर अगदी अणुमात्रही भय उरत नाही.

ज्याच्यामुळे भय वाटेल असे दुसरे कोणीतरी दिसणे म्हणजे इतर! जेव्हा प्रतिकूलतेची भावना येते ते सर्व इतर! परंतु अपर म्हणजे दुसरा! नुसते दुसरा आणि इतर यात भेद आहे.

रज्जुवर अज्ञानाने सर्प दिसतो म्हणून भय वाटते. आणि तेव्हा तो इतर भासतो. थोडक्यात इतर म्हणजे शत्रुत्व!

यस्मिन् सर्वाणि भूतानि ह्यात्मत्वेन विजानतः ।
न वै तस्य भवेन्मोहो न च शोकोऽद्वितीयतः ॥५४॥

ज्याच्या ठिकाणी सर्व भूते आत्मत्वाने पाहिली जातात, त्या ठिकाणी मोह नाही, शोक नाही. कारण द्वैतबुद्धी गेलेली आहे. धर्म आणि अधर्म याबद्दलचे अज्ञान अर्जुनाच्या मनात उत्पन्न झाले त्यामुळे त्याला शोक व मोह निर्माण झाले. (धर्मयुद्धात) परंतु विराटाच्या बाजूने लढता तो हिरीरीने लढला होता. कारण त्यावेळी शत्रू कोण आहे हे निश्चित होते. आणि अर्जुन केवळ विराटाच्या वृत्तीने लढत होता.

कुरुक्षेत्रावर मात्र तो धर्मसम्मूढचेतसः झाला होता. कारण समोर आप्त आहेत की शत्रू याबद्दल संभ्रम उत्पन्न झाला होता. व्यवहारात जेव्हा योग्य-अयोग्य यामध्ये निवड करायची असते, तेव्हा सल्ला घेतला जातो.

मात्र आत्मतत्त्वाचा विचार जेव्हा केला जातो तेव्हा सदसद्विवेकबुद्धी मार्गदर्शन करते.

अयमात्मा हि ब्रह्मैव सर्वात्मकतयास्थितः ।
इति निर्धारितं श्रुत्या बृहदारण्यसंस्थया ॥५५॥

हा आत्माच ब्रह्म आहे. तो सर्वत्र आत्मत्वाने भरलेला आहे असे बृहदारण्यकात सुद्धा निर्धाराने सांगितले आहे. सिद्धांतच मांडला आहे.
इथे द्वैताचे मिथ्यत्व सांगितले आहे.
अयमात्मा ब्रह्म हे बृहदारण्यकाचे वचन आहे.

चैतन्याचे जे भरले श्रुती ब्रह्माचे म्हणती त्यास।
बृहदारण्यक श्रुत्या सांगते आत्मतत्व ते खास॥५५॥

अनुभूतोऽप्ययं लोको व्यवहारक्षमोऽपि सन् ।
असद्रूपो यथा स्वप्न उत्तरक्षणबाधतः ॥५६॥

विश्व भासते ~~नश्वर~~ अनुभव होते तरि ते नश्वर होय।
निद्रेमाजी स्वप्न बघ असे क्षणिक विकारी होय॥५६॥

त्याप्रमाणे जाग येताक्षणीच स्वप्न असत् रूप (मिथ्या) आहे हे समजते, त्याचप्रमाणे या लोकात व्यवहार होत असूनही, अनुभवाला येत असूनही हे विश्व मिथ्या आहे.

स्वप्नो जागरणेऽलीकः स्वप्नेऽपि जागरो न हि ।
द्वयमेव लये नास्ति लयोऽपि उभयोर्न च ॥५७॥

अनुभव स्वप्नाचा खोटा स्वप्न जागृतीं नुरते।
स्वप्न जागृती नुरती दोन्ही विरती निद्रावस्थे॥५८॥

जागरणात स्वप्न नाही व स्वप्नात जागृती नाही.
निद्रेमध्ये तर दोन्ही नसते आणि स्वप्न व जागृतीमध्ये निद्रा नसते.

© www.madhaveelaghuweel.com

एका वेळेला एकच अवस्था असते. दुसऱ्या दोन्ही अवस्था त्यावेळी नसतात. ते सर्व मिथ्या असते. जेव्हा जागृतावस्थेत होणारा व्यवहार चालतो तेव्हा तो खोटा कसा मानायचा? तो त्या-तेवढ्या वेळेपुरता खराच असतो. त्या क्षणापुरते ते सत्य असते.

तीन सत्ता आहेत.

व्यावहारिक, पारमार्थिक, प्रातिभासिक

निद्रेमध्ये एकच व्यवहार - शांत झोप असते. निद्रा ही पारमार्थिक सत्ता आहे. निद्रेमध्ये केवळ जाणीव शिल्लक असते. परमार्थ सत्तेमध्ये दोन्ही सत्ता नसतात. म्हणून निद्रा ही ध्यानाच्या जवळची असते.

जो जीवन्मुक्त झाला त्याच्या दृष्टीने सर्व मिथ्याच असते.

त्रयमेवं भवेन्मिथ्या गुणत्रयविनिर्मितम्।
अस्य द्रष्टा गुणातीता मिथ्यो ह्येकश्चिदात्मकः ॥५९

स्वप्न जागृती निद्रा घडती त्रिगुणी आश्रय त्यांसी।
चैतन्याचा तो द्रष्टा त्यांचा आत्मा नाम तयासी ॥५८॥

तीन गुणांपासून (मायेपासून) उत्पन्न झाल्या असल्यामुळे या तीनही अवस्था मिथ्या आहेत. पण या अवस्था पाहणारा जो द्रष्टा आहे तो मात्र गुणातीत, नित्य, चिदात्मक आहे. तो साक्षी आहे. तिथे द्वैत नाही. आपल्यातील साक्षी आत्म्याशी आपण निद्रेमध्ये एकरूप होतो.

जगाकडे साक्षी भावनेने पहात असताना राग-द्वेष, शोक मोह उरतच नाहीत. परंतु गुणातीत होऊन थांबायचे नाही तर मायातीत व्हायचे आहे.

© www.madhaveeraghuveer.com

माया ही शुद्ध सत्वाची तर अविद्या ही शबल सत्वाची असते. अविद्या संपली तरी माया असतेच. माया ही ब्रह्माच्या आधिपत्याखाली येते.

तुरीयावस्थेत जाणे म्हणजे मायातीत होणे. तिथे केवळ साक्षीभाव उरतो.

आभास, विवर्त, अध्यास या गोष्टी तत्वज्ञानाच्या दृष्टीने महत्वाच्या असतात.

आभास म्हणजे जे नाही ते दिसणे आणि व्यवहार म्हणजे जे आहे ते न दिसणे.

— जगदाभास —

यद्वत् मृदि घटभ्रान्तिं शुक्तौ वा रजतस्थितिम्।
तद्वत् ब्रह्मणि जीवत्वं वीक्षमाणे न पश्यति ॥५४॥

जसे मृत्तिकी घट तो पाहे बघे चांदि शिंपीत।
जीव पाहतो ब्रह्म जणू ते बघतो ब्रह्म स्वतःत ॥५४॥

त्याप्रमाणे मातीवर घट किंवा शिंपलीवर चांदीचा भास होतो. त्याचप्रमाणे ब्रह्माच्या ठिकाणी जीवत्व भासते. पण खरे पाहता जे दिसत नाही.

भास गेल्याचे (घट फुटल्याचे) आपण दुःख करतो मूळ हजारी असल्याचे सुख मानत नाही व जे नव्हतेच त्याचे दुःख करत बसतो.

ब्रह्माच्या ठिकाणी जीवत्व भासते. खरे पाहिले तर ते दिसत नाही. जे दिसते ते ब्रह्मच असते.

जगदाभास होय ~~[illegible]~~ जग दिसते नाही ब्रह्मच दिसते.

© www.madhaveeraghuveer.com

यथा मृदि घटो नाम कनके कुण्डलाभिधा।
शुक्तौ हि रजतख्यातिः जीव शब्दस्तथा परे ॥६०॥

घटात बघतो मृत्तिकेस तो आभूषण जणु सोने।
शिंपल्यात तो रजता बघतो जीव आत्मतत्त्वाने॥

माती घट नावाने, सोने अलंकार नावाने, शिंपली चांदी नावाने बोलली जाते. त्याचप्रमाणे ब्रह्माचा उल्लेख जीव शब्दाने होतो.

यथैव व्योम्नि नीलत्वं यथा नीरं मरुस्थले।
पुरुषत्वं यथा स्थाणौ तद्वद्विश्वं चिदात्मनि ॥६१॥

~~चैतन्याचे जे भरले मूर्ति ब्रह्माचे म्हणती त्यास।~~
~~ब्रह्माकारण्यक पुन्हा सांगते आत्मतत्त्व ते खास॥६१॥~~

आकाश निळे आहे. वाळवंटात पाणी आहे. खांबाच्या ठिकाणी मनुष्याकृतीचा भास होतो. त्याचप्रमाणे चिदात्म्याच्या ठिकाणी विश्वाचा आभास आहे.

यथैव शून्ये वेतालो गन्धर्वाणां पुरं यथा।
यथाकाशे द्विचन्द्रत्वं तद्वत् सत्ये जगत्स्थितिः ॥६२॥

एकांतात भुते येते नभी भासति जी घरे।
चंद्र ते दोन आकाशी तितके विश्व सत्य हो॥६२॥

शून्य ठिकाणी वेताळ, आकाशात गांधर्व नगर किंवा दोन चंद्र भासणे यात जेवढे सत्य आहे तेवढेच खरेपण या जगाच्या स्थितित आहे.

© www.madhavaraghuveer.com

तरंग लाटा पाण्यावरती, दिसती पाणी परि ते ।
पात्ररूपे भासे तांबे, विश्वरूप ब्रह्माचे ते ॥६३॥



वस्तुतः अजिबात सत्य नसलेले जग हे सत्य मानले जाते. ब्रह्म सत्य जगन्मिथ्या।

कणवाद, परिणामवाद,

जे दिसते ते लय पावणारे आहे.

भास हा अज्ञानातून होतो. ज्ञान झाले की भास संपतो.

ब्रह्मावर सृष्टीचा आरोप केला जातो.

जीवाच्या स्वतःविषयी भ्रामक कल्पना असतात. आपण स्वतः वरच स्त्री, गृहिणी, पत्नी, शिक्षिका असे आरोप करत असतो.

पूज्य आद्य शंकराचार्य नेहमी श्रुतिस्मृतिंचा आधार घेतात. मी सांगतो असे कधीही म्हणत नाहीत.

आस्तिक दर्शनांना श्रुतिचा आधार आहे तर नास्तिक दर्शनांना कोणताही आधार नाही.

जैन, बौध्द, चार्वाक ही नास्तिक दर्शने आहेत.

## प्रकरण - ८ वे

## जगदाभास

यथा तरङ्गकल्लोलैर्जलमेव स्फुरत्यलम् ।
पात्ररूपेण ताम्रं हि ब्रह्माण्डौघैस्तथात्मना ॥६३॥

ज्याप्रमाणे पाणीच लाटारूपाने स्फुरण पावत असते. त्याचप्रमाणे तांबेच भांडेरूपाने व्यक्त होत असते. तसेच ब्रह्मच ब्रह्मांडाच्या आधाररूपाने व्यक्त होत असते.

पाणी व तांबे हे अधिष्ठान आहे तर लाटा व भांडे हा भास आहे.

ब्रह्मांड (प्रपंच) हा ब्रह्माचा आधार आहे.

जलाच्या आश्रयानेच लाटेची उत्पत्ति, स्थिति, लय असते त्यात सातत्य दिसत असूनसुध्दा तो आभासच असतो.

© www.madhaveeraghuveer.com

॥६०॥ रूप जे घाट बघे मृत्तिका, वस्त्री बघतो तंतू।
विश्वा बघता त्याला ओळखे, मूळ ब्रह्म सद्वस्तू॥

एक सद्भाव आहे आणि आभास हा क्षणिक आहे.
अधिष्ठानावर आभास होतो.
जग बदलत आहे असे वाटते परंतु ब्रह्म तेच आहे. बदल आहेत ते नामरूपाचे आहेत. कारण एक शाश्वत असल्याखेरीज आभासाचा ओघ चालू रहाणार नाही.
इथे अक्रम चा अर्थ वारंवार असा आहे. जसे वाणीचा ओघ भुलवणारा परंतु त्यात आशय Content नसेल तर व्यर्थ आहे
उन्मेष, स्फूर्ति, अक्रम
ज्याला स्फुरण नाही, ते नसेच आहे — ब्रह्म आणि जे स्फुरते ते मात्र बदलत आहे — विश्व.

घटनाम्ना यथा पृथ्वी पटनाम्ना हि तन्तवः।
जगन्नाम्ना चिदाभाति ज्ञेयं तत्तद् अभावतः॥६०॥

त्याप्रमाणे माती घट नावाने, तंतु पट नावाने भासतात, भावतात, प्रकाशतात त्याप्रमाणे जग नावाने चिद् (चैतन्य) भावते परंतु वस्तुतः त्याचा (जगाचा) अभाव असतो.
घट, पट आणि विश्व हे मुळात नाहीच परंतु तरीही ते भासतात.
चिद्, चैतन्य, प्रकाशमानता आहे.
मूळ घट नसून माती आहे. मूळ कापड नसून तंतु आहे खरे तर उत्पाद्य कर्म हा भासच असतो.
आपण ज्याला टेबल, खुर्ची म्हणून ओळखतो, ते वास्तविक लाकूड असते. ज जाणावयाचे ते अभावानेच (नाहीच या भावाने) जाणून घ्यावे.
ब्रह्मसूत्र — शारीरिक भाष्य — घटपटादि चर्चा

सर्वेऽपि व्यवहारस्तु ब्रह्मणा क्रियते जनैः।
अज्ञानात् न विजानन्ति मृदेव घटादिकम्॥६५॥

कर्मे करुनि लोकही सारे सेविती ब्रह्मस्वरूपा।
परि अज्ञाने जसे नेणती सेविती कोण्यारूपा॥६५॥

लोकांकडून होणारा व्यवहार वस्तुतः ब्रह्मामुळे होत असतो पण घटादीत मातीच आहे हे अज्ञानामुळे लक्षात येत नाही.

व्यवहार करताना घट, अलंकारच हवे. माती किंवा सोने नाही.

ब्रह्माचे अधिष्ठान नसेल तर व्यवहार होणारच नाही. पणती बनवण्यासाठी माती हवीच. कोणती वस्तु बनवायची त्याप्रमाणे माती हवी. मातीचे सत्यत्व कळत नाही तोवर अज्ञान आहे. तसेच ब्रह्म वेगळे व जग वेगळे असे मानले जाते.

व्यवहारात द्वैत आहे, वस्तुतः द्वैत नाही, सर्वत्र अद्वैतच आहे. ब्रह्म हे एकमेवाद्वितीय असून ते विविधरूपाने नटले आहे.

कार्यकारणता नित्यमास्ते घटमृदोर्यथा।
तथैव श्रुतियुक्तिभ्यां प्रपंच ब्रह्मणोरिह॥६६॥

कार्य जैसे कारणाशी घट मृत्तिकेमाजी।
विश्व ब्रह्मी तशीच आहे सांगतसे हे आजी॥६६॥

घट आणि माती यामध्ये जसा नेहमी कार्यकारणभाव असतो त्याचप्रमाणे श्रुती व युक्ती यांच्या सहाय्याने प्रपंच आणि ब्रह्म यांचा संबंध जाणावा.

© www.madhaveeraghuveer.com

कारणात् कार्यम्
मृत्तिका —— घट } श्रुति युक्तिंच्या सहाय्याने हा
ब्रह्म —— जग } संबंध समजावून घ्यावा.

कारण एकच असले तरी कार्यामुळे द्वैत दिसू लागले. कारणातील काही गुण कार्यात दिसतातच. परंतु कार्यातील गुण कारणात नसतात.

मातीला आकार नाही पण घटाला आकार आहे. मातीच्या धारणागुण घटाने घेतला.

| उपादान कारण | | निमित्त कारण |
|---|---|---|
| समवायी | असमवायी | नेहमी चेतन असते. |
| चाक, दांडा | एकत्र आणण्याचे काम | कुंभार. चित (चैतन्य) |

गव्हाची पोळी करण्याचे काम अनेकजण करतात. त्याचे समवायी कारण एकच असले तरी असमवायी कारण भिन्न असते. म्हणून पोळी पोळी मध्ये वेगळेपणा असतो. कारणापासून जेव्हा कार्य बनते तेव्हा शक्यता येते.

गृह्यमाणे घटे यद्वत् मृत्तिकाऽयाति वै बलात् ।
वीक्ष्यमाणे प्रपञ्चेऽपि ब्रह्मैवाभाति भासुरम् ॥६०॥

पाहता घटा जाण मृत्तिका मूळ त्यामध्ये आहे
बघता विश्वा जाण ब्रह्म त्या कारण एकच आहे ॥६०॥



घट हातात घेतला म्हणजे आपोआप माती हातात आलीच. त्याचप्रमाणे प्रपंचाकडे पहात असताना ब्रह्मच तेजस्वीपणे प्रकाशते. परंतु ते स्थूल दृष्टीला दिसत नाही. सर्व प्रपंच ब्रह्माच्या चित तत्त्वामुळेच भासतो आहे त्याला प्रकाशित करणारे हे ब्रह्मच आहे.

© www.madhuraveeraghuveer.com


हे सर्व स्थूल दृष्टीने पहात असताना, विश्वाचा अनुभव येतो, आतील ब्रह्मतत्त्व लक्षातच येत नाही.
'अहं ब्रह्मास्मि' म्हणण्यासाठी सूक्ष्म दृष्टी हवी.
बाह्य गोष्टींकडे पहात असताना भेद जाणवतो.
जरायुज योनिमध्ये नाळ जोडलेली असते. Placenta
या सर्व चारही योनीतील ब्रह्मभाव तेजस्वी आहे.
आनंद हा चित्‌चा असतो.
अंकुर वर आला की माळ्याला आनंद होतो.
Test Tube Baby – शुक्राणु संयोग बाहेर झाला तरी ते अंडे पुन्हा आईच्या गर्भात घालावे लागते, तेव्हाच जीव निर्माण होतो.
स्वेदज – वेलदज – ओलावा असतो. ऊवा, ढेकूण
रयि – प्राण Energy – Matter यात समन्वय असतो.
सात्त्विक आहाराने पुष्टि होते तर राजस आहाराने क्रियाशक्ति वाढते
सृष्टीतील अन्न नाहीसे होऊ नये म्हणून पंचयज्ञ सांगितले आहे.

सदैव आत्मा विशुद्धोऽस्मि ह्यशुद्धो भाति वै सदा।
यथैव द्विविधा रज्जुः ज्ञानिनोऽज्ञानिनोऽनिशम् ॥६८॥

ज्ञानी आत्म्या शुद्ध पाहतो अशुद्ध म्हणतो मूढ।
ज्ञानी पाहे रज्जु, त्यासी सर्पचि म्हणतो मूढ ॥६८॥

आत्मा नेहमी विशुद्धच आहे, असा मूळ सिद्धांत असून देखील अज्ञानी माणसाला तो अशुद्धच भासतो. रज्जु ज्याप्रमाणे दोन प्रकारांनी दिसते, तसे ज्ञानी व अज्ञानी माणसाला वेगळेपणा दिसतो. दोरी तीच आहे परंतु ज्ञानी माणसाला तो दोरी स्वरूपाने दिसेल – विशुद्ध ब्रह्म
तर अज्ञानी " " सर्प " " अशुद्धता
मूळ ब्रह्माचे ज्याला ज्ञान नाही तो आत्म्यावर चांगले वाईट आरोप करतो. खरे तर जीव-जगत्-जगदीश एकच आहे.

© www.madhaveeraghuveer.com





# अज्ञान जीव विचार प्रकरण - ९८

यथैव मृण्मयः कुम्भः तद्वत् देहोऽपि चिन्मयः।
आत्मानात्मविभागोऽयं मुधैव क्रियते अबुधैः॥६९॥

घट-स्वरूपी माती जैसी, देही तेवि चैतन्य।
अनात्म किंवा आत्मा ऐसा भेद बघे अज्ञान॥६९॥

मुधैव - निष्कारण.
घट जसा मातीमय त्याप्रमाणे देहही चिन्मय असतो. परंतु अज्ञ लोक उगीचच आत्मा व अनात्मा असा भेद मानतात.

सर्पत्वेन यथा रज्जुः रजतत्वेन शुक्तिका।
विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता॥७०॥

रज्जु मानिला सर्प तो जणु म्हणे चांदि शिंपीस।
~~शरीरास तसा आत्मा~~
शरीरचि दिसे आत्मा ऐसे अज्ञ मूढबुद्धीस॥७०॥

दोरी जशी सर्पत्वाने निश्चित करतात. शिंपली रजतत्वाने निश्चित करतात त्याचप्रमाणे विमूढ लोक (संभ्रमितपणामुळे) आत्मा देहत्वाने निश्चित करतात. विनिर्णीता - ठामपणे निश्चय करणे

घटत्वेन यथा पृथ्वी पटत्वेनैव तन्तवः।
विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता॥७१॥

मातीला तो म्हणे घट तसा वस्त्र म्हणे तंतूस।
शरीरचि दिसे आत्मा ऐसे मूढ अज्ञ बुद्धीस॥७१॥

© www.madhaveeraghuveer.com

जसे पृथ्वी घटत्वाने, तंतु पटत्वाने संभ्रमित लोक निश्चित करतात, त्यांप्रमाणे आत्मा देहत्वाने निश्चित करतात.

इथे कार्य-कारण भाव आहे.

तंतु हे कारण तर पट हे कार्य आहे.

माती हे कारण तर घट हे कार्य आहे.

परंतु सामान्य लोकांची कार्याला महत्त्व देण्याची वृत्ती असते.

कनकं कुण्डलत्वेन तरंगत्वेन वै जलम् ।
विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता ॥७२॥

तसे सुवर्ण म्हणू भूषण, म्हणे लाट पाण्यास।
शरीराचि दिसे आत्मा ऐसे अज्ञ मूढ बुद्धीस॥७३॥

सोने अलंकार रूपाने, पाणी लाटेच्या रूपाने, जसे निश्चित केले जाते त्याप्रमाणे आत्मा देहत्वाने निश्चित करतात.

सर्व व्यवहार रूपावर अवलंबून असतात.

नाजुक, वैशिष्ट्यपूर्ण अलंकाराची किंमत अधिक असते पाणी सौम्य परंतु लाट जीवघेणी होऊ शकते.

नामरूपावर दृष्टी असणारे मूढ असतात.

पुरुषत्वेन यथा स्थाणुर्जलत्वेन मरीचिका ।
विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता ॥७३॥

पुतळा म्हणतो माणूस ऐसे मृगजळ शुद्ध जलास।
शरीराचि दिसे आत्मा ऐसे अज्ञ मूढ बुद्धीस॥७३॥

© www.madhaveeraghuveer.com

असे खांबाच्या (किंवा पुतळ्याच्या) ठिकाणी पुरुषत्व मृगजळाच्या ठिकाणी जलत्व तसे आत्मा देहत्वाने निश्चित केला जातो

गृहत्वेनैव काष्ठानि खड्गत्वेनैव लोहता।
विनिर्णीता विमूढेन देहत्वेन तथात्मता॥७८॥

लाकूड दगडा घर मानी तो म्हणे खड्ग लोहास।
शरीरचि दिसे आत्मा ऐसे अहा मूढ बुद्धीस॥७८॥

ज्याप्रमाणे घराच्या संबंधाने लाकडाचा, खड्गाच्या संबंधाने लोहाचा निश्चय केला जातो त्याप्रमाणे आत्मा हा देहत्वाने निश्चित केला जातो.

विमूढ म्हणजे ज्याला ब्रह्मज्ञान/आत्मज्ञान नाही.
मय हा शब्द त्या द्रव्याचे प्राचुर्य दाखवतो.
मृण्मय म्हणजे ज्यात माती अधिक आहे.
चिन्मय म्हणजे चैतन्याचे प्रमाण अधिक आहे.

व्यवहारातील उपयोगाप्रमाणे (मूल्य) त्या वस्तूकडे आपण पाहतो. आत्मा हे मूळ अधिष्ठान असूनसुद्धा देह म्हणून पहातो ही व्यावहारिक सत्ता आहे.

अज्ञानी जीवदशा सोडल्याखेरीज 'अपरोक्षानुभूति' मिळणार नाही.

त्यासाठी संभ्रमावस्था सोडायला हवी. अधिष्ठानाकडे पहायला शिकायला हवे. नाहीतर फसगत होते. परंतु जगाचा व्यवहार हा भ्रमामुळेच चालतो. तद्वृत्तिकडे कल असणारा माणूस साध्यापासून दूर जातो. प्रपंचातील जोडगे– कर्मकांड– मूढत्वावर आधारित आहेत. कर्म, उपासना यांनी मुक्ति मिळत नाही. उपासनेने गौणी फळ मिळेल परंतु प्रधान फळ मिळणार नाही. ध्रुवाने उपासना केली परंतु ज्ञानाची साधना घडली नाही त्यामुळे ध्रुवाला देखील मुक्ति नाही.

© www.madhaveeraghuveer.com

निवासासाठी घर हवे. रक्षणासाठी शस्त्र हवे हे जरी खरे असले तरी त्याचे (घराचे) अधिष्ठान हे लाकूड आहे. घर हा व्यवहार आहे.

सामान्यपणे अधिष्ठानाकडे लक्ष न जाता व्यवहारालाच महत्त्व दिले जाते. परंतु ज्ञानावस्थेत मात्र अधिष्ठान हे सत्य आणि व्यवहार मिथ्या आहे. आणि म्हणूनच अज्ञानी लोक देहालाच आत्मा समजतात व व्यवहारात रमतात. (दैहिक व्यवहार करतात.)

पारमार्थिक सत्ता, व्यावहारिक सत्ता आणि प्रातिभासिक सत्ता यानुरूप मूलभूत गोष्ट - व्यावहारिक वस्तु या ज्ञानावर (अज्ञानावर) अधिष्ठित कशा आहेत. हे स्पष्ट करणारा हा श्लोक आहे.

जगदाभासानंतर आलेला हा विचार आहे.

प्रातिभासिक सत्ता म्हणजे संभ्रम!

बुजगावणे हा संभ्रमच आहे. तिथे घरावर माणसाच्या डोक्याचा आभास होतो.

© www.madhavveeraguruveer.com

| M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 27 | 28 | 29 | 30 | | |

APRIL - 2015

MARCH 21 SATURDAY

WK 12 (080-285)

५ जानेवारी २०१८

प्रकरण - १० वे

अज्ञान लक्षण ७५ ते ८

जाणीव - नेणीव

ज्याला अज्ञान म्हणतो ती एक प्रकारची जाणिवच असते. जेव्हा जाणवते तेव्हा ज्ञान होते.

गूळ खाल्ला की गोडीचे ज्ञान होते.

आत्मा —— मन —— इंद्रिये —— इंद्रियार्थ

जाणीव

ज्ञान नेणीव

लहान मुलाला प्रथम 'चिमणी' शब्दाचे ज्ञान नसते.

प्रवृत्ति - निवृत्ति —— सामान्यपणे जाणिव असते.

जाणीव नेणीव मावली नाही.

म्हणजे तिथे ज्ञानही नाही अज्ञानही नाही.

प्रवृत्तिकडून निवृत्तिकडे जाता येते.

दर्शनकारांची जाणिव ही मूळ जाणिव नाही

मर्यादित विचार आचार्यांना मान्य नाही.

अद्वैत भाव ही ईश्वरची पायरी आहे. परंतु तिथेही 'मी ज्ञानी आहे' असे वाटले तर ते अज्ञानच आहे.

साखर गोड आहे याची एकदा अनुभूति घेतली की पुढच्या प्रत्येक वेळेस त्याचा (गोडीचा) अनुभव येतो.

परब्रह्माच्या तीन शक्ती आहेत.

क्रियाशक्ती, ज्ञानशक्ती, द्रव्यशक्ती.

SUNDAY 22

© www.madhavaraghuveer.com

## बिंब प्रतिबिंब

यथा वृक्षविपर्यासो जलात् भवति कस्यचित् ।
तद्वत् आत्मनि देहत्व पश्यत्यज्ञानयोगतः ॥७५॥

वृक्षाचे जळि बिंब पाहुनि म्हणे वृक्ष हा आहे।
अज्ञानाने तसे शरीरा म्हणतो आत्मा आहे॥७५॥

आत्म्याच्या ठिकाणी अज्ञानामुळे देहत्व पाहतो, ज्याप्रमाणे एखाद्याला पाण्यामध्ये वृक्ष उलटा दिसतो.
कस्यचित् - ज्याला मूळ सिद्धांत माहिती नाही असा अज्ञानी। ज्याला आत्म्याविषयी ज्ञान नाही तो।
ज्ञानादेव तु कैवल्यम्।

आणि

पोतेन गच्छतः पुंसः सर्वं भातीव चञ्चलम् ।
तद्वत् आत्मनि देहत्व पश्यत्यज्ञानयोगतः ॥७६॥

होडीत बसता वृक्ष चालती ऐसे दिसत आहे।
अज्ञानाने तसे शरीरा म्हणतो आत्मा आहे॥७६॥

नौकेत बसून जाणाऱ्या पुरुषाला सर्व काही गतिमान चंचल भासते. (अर्थात कोणत्याही वाहनात) गति कोणाची याविषयी अज्ञान आहे. वास्तविक गती वाहनाची असूनसुध्दा इतर स्थिर वस्तू (झाडे, खांब, घरे) गतिमान भासतात.
पळती झाडे पाहूया.
हे लहान मुलांच्या किंवा रसिकतेच्या दृष्टीने योग्य असले तरी बोधाच्या दृष्टीने हे अयोग्य आहे

© www.madhaveeragniveer.com

## दृष्टी-दोष

पीतत्वं हि यथा शुभ्रे दोषात् भवति कस्यचित्।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥६७॥

काविळ होता शुभ्र वस्तुही वाटे पिवळी आहे.
अज्ञानाने तसे शरीरा म्हणतो आत्मा आहे.

व्याधीमुळे एखाद्याला पांढऱ्या शुभ्र वर्णातही पिवळेपणा दिसायला लागतो. म्हणजेच इथे जाणिव ही नेणिवेत गेली परंतु त्याच्या दृष्टीने तो पिवळा रंग असतो ही देखील त्याची जाणिवच आहे. अज्ञान हे अपरोक्षानुभूतिच्या आड येते.

चक्षुभ्यां भ्रमशीलाभ्यां सर्वं भाति भ्रमात्मकम्।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥६८॥

दृष्टिदोष तो ज्याला असतो, दिसते दोषी जग हे।
अज्ञानाने तसे शरीरा आत्मा म्हणतो आहे॥६८॥

भोवळ आलेल्या व्यक्तीच्या डोळ्यांना सारे भ्रमात्मक (फिरणारे) दिसते. मागील श्लोकामध्ये (६६ व्या) वाहनाला गती होती. आता इथे व्यक्तिलाच गती प्राप्त झाल्यामुळे सारे जग तिच्याभोवती फिरते आहे

© www.madhaveeraghuveer.com

## वस्तुची आकारभिन्नता

अलातं भ्रमणेनैव वर्तुलं भाति सूर्यवत् ।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥७९॥

तेजवस्तु जी गोल फिरे ती म्हणे सूर्य तो आहे।
अज्ञानाने तसे शरीरा, म्हणतो आत्मा आहे॥७९॥

अलात - जळके लाकूड, कोलीत.
मूळ आकाराची वस्तु वेगळ्या स्वरूपात दिसते. उदबत्ती देखील वेगाने गोल फिरवली तर तेजाचे वर्तुळ दिसते.

दूरत्व —

महत्त्वं सर्ववस्तूनामणुत्वं ह्यतिदूरतः ।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥८०॥

विशाल वस्तु जरी दूर ती दिसे सूक्ष्मशी आहे।
अज्ञानाने तसे शरीरा म्हणतो आत्मा आहे॥८०॥

मोठे असूनसुद्धा आणि दूरतेमुळे वस्तु अति लहान दिसतात. विमानातून खाली पाहताना घरे, इमारती गाड्या अत्यंत लहान दिसतात.
इथे जाणिवही आहे आणि नेणीवही आहे अर्थात नेणीव असली तरी नम्रता हवी. आणि नम्रता असेल तोवर ज्ञानाची शक्यता आहे, कारण नेणीव असणे ही सुध्दा एक प्रकारची जाणीवच आहे. कारण त्याच्यापुरते ते खरेच असते.
अगदी नवजात अर्भकाला सुध्दा स्तनपानाचे ज्ञान अव्याबाधित होते. आणि त्यासाठी त्याला स्तनपानापूर्वी मध चाटवतात.

© www.madhaveeraghuveer.com

## साधन

सूक्ष्मत्वे सर्वभावानां स्थूलत्वं चोपनेत्रतः ।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥ ८१ ॥

वस्तु सूक्ष्म जशी लोलकातुनी मोठी दिसते आहे ।
अज्ञानाने तसे शरीरा, म्हणतो आत्मा आहे ॥ ८१ ॥

भिंगामुळे लहान गोष्टी मोठ्या दिसतात. जिथे बारीक गोष्टी नीट जाणता येत नाहीत तिथे साधन वापरायचे. — भिंग, चष्मा, दुर्बिण, सूक्ष्मदर्शक.

काचभूमौ जलत्वं वा जलभूमौ हि काचता ।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥ ८२ ॥

काच-पृष्ठ जै वाटे पाणी, पाणी काचाशी वाटे ।
अज्ञानाने तसे शरीरा म्हणतो आत्मा आहे ॥ ८२ ॥

मयसभेचे वर्णन असेच आहे.
काचेच्या केवळ पृष्ठभागाकडे लक्ष दिले तर जलाचा भास होतो. परंतु नीट लक्ष दिले तर आत हालचाल नाही हे लक्षात येते.

जाणीव जेव्हा एकाच इंद्रियापर्यंत मर्यादित राहते तेव्हा माणसे फसतात. सर्वांगाने विचार केला तर फसगत होत नाही.

काचेला हात लावून, काठीने किंवा खडा मारून जर पाहिले असते तर लगेच ध्यानात आले असते.

स्व. इंदिरा गांधी यांचे दिल्ली येथील स्मारक अशा प्रकारचे आहे. त्या स्मारकाच्या बाजूला रक्त ओघळत असल्याचा भास होतो.

© www.madhaveeraghuveer.com

## एकच गुण लक्षात घेणे

यद्वत् अग्नौ मणित्वं हि मणौ वा वह्निता पुमान्।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥८३॥

मण्यास पाहुनि म्हणे निखारा, निखाऱ्याला जो मणी पाहे।
अज्ञानाने तसे शरीरा, म्हणतो आत्मा आहे॥८३॥

पुरुषाला ज्याप्रमाणे अग्निच्या ठिकाणी मणी किंवा मण्याच्या ठिकाणी अग्नि वाटतो. त्याप्रमाणे ------

अग्निचा केवळ लाल-केशरी रंग लक्षात घेतल्यामुळे मण्याशी साधर्म्य वाटले. वास्तविक अग्निची दाहकता व मण्याची शीतलता असा गुणांच्या दृष्टीने फरक लक्षात घ्यायला हवा.

कीटकभक्षी वनस्पती असतात. त्यांचा मोहकपणा किंवा सुगंध लक्षात घेऊन त्याकडे झेप घेतली तर सर्वनाशच संभवतो.

लाजाळूची पाने स्पर्श करताच मिटून घेतात, केवळ रंगरूपावर भुलल्यामुळे विपरीत ज्ञान होते.

### गतिमधील फरक

अभ्रेषु सत्सु धावत्सु सोमो धावति भाति वै।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः ॥८४॥

मेघ धावतो नभात वारे चंद्र धावतो आहे।
अज्ञानाने तसे शरीरा, म्हणतो आत्मा आहे॥८४॥

आकाशात ढग धावू लागले तर चंद्र धावतो आहे असे वाटते. वास्तविक विश्व ही पोकळी असून काही वस्तू गतिमान तर काही गतिहीन आहेत. चंद्र काही गतिहीन नाही. परंतु तरीही चंद्राच्या गतीपेक्षा ढगांची गती अधिक असल्याने चंद्र धावतो असे वाटते. गतिचा आरोप कुणावर होतो यावर हे अवलंबून आहे.

© www.madhavvaradhuweer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

APRIL - 2015

MARCH 2015 SATURDAY 28

WK 13 (087-278)

यथैव दिग् विपर्यासो मोहात् भवति कस्यचित्।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः॥८५॥

भोवळ येता न कळे चित्ता दिशा कोणती आहे।
अज्ञानाने तसे शरीरा म्हणतो आत्मा आहे॥८५॥

भुलभुलैय्या मध्ये नीटसे समजत नाही. खाणाखुणा लक्षात रहात नाहीत. वाऱ्यामुळे वाळूचा प्रवाह बदलतो त्यामुळे वाळवंटात दिशा समजत नाही. अशा वेळी जाणकाराशिवाय सुटका होऊ शकत नाही. तसेच या म्हणति विचार करण्याच्या बुद्धीवर पडदा पडला तर भ्रम होतो.

यथा शशी जले भाति चंचलत्वेन कस्यचित्।
तद्वत् आत्मनि देहत्वं पश्यत्यज्ञानयोगतः॥८६॥

चंद्रबिंब ते जळात वाटे, चंद्र हालतो आहे।
अज्ञानाने तसे शरीरा, आत्मा म्हणतो आहे॥८६॥

वास्तविक हलत नसताना पाण्यामध्ये चंद्र हलत आहे असे वाटते. जाणीव नेणीवेतून सुंदर गोष्टी (कविता) घडतात.

एवमात्मन्यविद्यातो देहाध्यासो हि जायते।
स एवात्म परिज्ञानात् लीयते च परात्मनि॥८७॥

SUNDAY 29

जीवात्म्यावर अज्ञानाने देह लादला आहे।
ज्ञानोदय परि होता देही, आत्मी लय त्या आहे॥८७॥

या उपाधीमाजी गुप्त। चैतन्य असे सर्वगत।
ते तत्वज्ञ संत। स्वीकारिती॥ ज्ञाने. २.१२६॥

© www.madhaveeraghuveer.com

अशा प्रकारे या उदाहरणानुसार देहावर आत्म्याचा अध्यास केला जातो (आरोप) आणि त्याचे आत्म्याचे सर्वतः ज्ञान झाले की तो परमात्मस्वरूपात लीन होतो.

सर्वात्मतया ज्ञाते जगत् स्थावरजंगमात्मके।
अभावात् सर्वभावानां देहस्य चात्मता कुतः॥८८॥

चराचर जगत् सर्वही कधी आत्मा होऊनी राही।
त्याच्याविण ना अन्य या जगीं शरीर आत्मा नाही॥८८॥

सर्व सृष्टी ही ब्रह्मस्वरूपच आहे असे म्हटल्यावर सर्वच भाव नाहीसे होतात. मग अशा वेळी आत्म्याच्या ठिकाणी देहभाव कसा उत्पन्न होईल?

ज्ञोपर्यंत सर्व एकच आहे हे कळत नाही तोपर्यंत भेद वाटत राहतो. वस्तुतः जाणीव एकच असून त्यात भिन्नता निर्माण झाली. मात्र 'अहं ब्रह्मास्मि' ही जाणीव झाल्यावर भेद उरणारच नाही.

आत्मानं सततं जानन् कालं नय महाद्युते।
प्रारब्धमखिलं भुञ्जन् नोद्वेगं कर्तुमर्हसि॥८९॥

काळ घालवी जगी सुबुद्धे, स्मरुनी आत्मा सतत।
प्रारब्धही ते सर्वही भोगी न करी त्याची खंत॥८९॥

हे तेजस्वी बुद्धिमान शिष्या, तू सतत आत्मस्वरूपाला जाणून घेण्यात काळ घालवे. हे करत असताना प्रारब्धभोग भोगायला लागणारच. त्याविषयी, तू उद्वेग करणे योग्य नाही.

हर्षाने / दुःखाने तू क्षुब्ध होऊ नकोस. आयुष्यभर आत्मज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न कर. आणि ते प्राप्त झाल्यावर त्यातच रहा. आत्मज्ञानाची जाणीव हे जीवनाचे अधिष्ठान असले पाहिजे.

© www.madhaveeraghuveer.com

चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम्।
प्रारब्ध भोगताना त्यातून क्रियमाण निर्माण करायचे
Reaction हे क्रियमाण। विषयाशी एकरूप झाले की
क्रियमाण घडत नाही. ईश्वरेच्छा बलीयसी।

॥श्री॥

१२ जानेवारी २०१६

हरिपाठ अभंग-
जाणीव नेणीव भगवंती नाही।
उच्चारण पाही मोक्ष सदा॥

© www.madhavveeraghuveer.com

## - प्रारब्ध निराकरण -

साधकाला प्रारब्ध भोगायला सांगितले असले तरी सिद्धाला तसे सांगितले नाही.

उत्पन्नेऽध्यात्मविज्ञाने प्रारब्धं नैव मुञ्चति।
इति यत् श्रूयते शास्त्रे तन्निराक्रियतेऽधुना ॥६०॥

आत्मविज्ञान झाले तरी प्रारब्ध सुटत नाही, असे जे शास्त्रांमधून ऐकले जाते त्याचे आता निराकरण करत आहे.

प्रारब्ध सोडिना केव्हा जरी का ज्ञान लाभता।
असे जे वर्णिले शास्त्री, त्याचे खंडन हे पुढे ॥६०॥

या श्लोकाच्या अर्थाशी विरोधी वाटणारा (परंतु प्रत्यक्षात नसणारा) असा पुढील श्लोक आहे. त्याचा विचार सावधपणे करायला हवा.

तत्त्वज्ञानोदयात् ऊर्ध्वं प्रारब्धं नैव विद्यते।
देहादीनाम् असत्त्वात् तु यथा स्वप्नो विबोधतः ॥६१॥

ज्ञानदर्शना अंतरी करी प्रारब्धाचा अंत।
देहरूप त्या नुरते जैसे स्वप्न जागत्या सतत ॥६१॥

यथेधांसि समिद्धाग्नि

तत्त्वज्ञानाचा उदय झाला की प्रारब्ध रहात नाही. जसे स्वप्न खोटे आहे हे जागृतावस्थेत समजते. त्याप्रमाणे देहादि गोष्टी ही असत् आहेत.

स्थूल देह - वेदना, व्याधि
सूक्ष्म देह - सुख दुःख
कारण देह - जन्म मृत्यु संसार.

© www.madhaveeraghuveer.com

देह पडेपर्यंत हे भोग भोगायलाच हवेत
तत्वज्ञानाने सत /असत ये ज्ञान होते.
एकाचे कर्म हे दुसऱ्याचे प्रारब्ध होते.
. सायकलची धडक बसणे, घरात चोरी होणे.
अचानक भिंत कोसळून अंगावर पडणे.
प्रारब्धाविषयी विवेकचूडामणि या आचार्यांच्याच
दुसऱ्या प्रकरण ग्रंथामध्ये काही श्लोक आहेत.
४४६ ते ४६८

अनायासे घडे इच्छा असे नसे
प्रारब्ध ते ऐसे म्हणो येथे।
एकाचे जे प्रारब्ध ते अन्या क्रियमाण।
चोरी हत्या दान क्रियमाण।
आग्रह वासना सोडोनि सकळ
घडे जे केवळ प्रारब्ध ते।
ब्रह्मज्ञानाविण नसे रे वासना
तरि ब्रह्मज्ञाना अभ्यासावे।
ब्रह्मज्ञानी नित्य आनंद संपूर्ण
यतिनारायण भोगू पाहे॥

कर्म जन्मान्तरीयं यत् प्रारब्धमिति कीर्तितम्।
यत्तु जन्मान्तराभावात् पुंसो नैवास्ति कर्हिचित् ॥९२॥

कर्म संच जो पूर्व जन्मीचा प्रारब्धाची त्या नाव।
पुरले जेथ जाण्यालागी पुनर्जन्म नो ठाव॥९२॥

पूर्वजन्मीचे कर्म जे प्रारब्ध म्हणून म्हटले जाते ते जन्मांतराच्या अभाव झाल्याने पुरुषाला कोणत्याही तऱ्हेने कशाही प्रकारे असत नाही.

© www.madhaveeraghuveer.com

प्रारब्ध म्हणजे कर्माचे फळ आहे. जर कर्तृत्वभावच संपला तर फळ भोगावे लागणार नाही. अर्थात साधकाने कोणती उंची गाठली यावर ते अवलंबून आहे. त्याची स्थिती कोणती आहे, यावर ते ठरत असते.

कर्म हे नेहमीच अव्यक्त असते. त्याचा परिणाम मात्र भोगावा लागतो. याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे तसा प्रयत्न केला जात नाही आणि दुसरे म्हणजे खरोखरच कळत नाही.

स्वप्नदेहो यथाध्यस्तः तथैवायं हि देहकः।
अध्यस्तस्य कुतो जन्म जन्माभावे हि तत् कुतः ॥९३॥

देह वाटतो ज्ञान्यालागी भास जसा तो स्वप्नी।
ज्ञान्याच्या त्या मिथ्या देहा पुनर्जन्म तो कुठुनी ॥९३॥

स्वप्नामध्ये देहावर केलेले आरोप जसे व्यर्थ जातात, तसेच जागृतावस्थेतील देहसुद्धा अध्यस्तच आहे. मग अध्यस्ताला जन्म कुठला? आणि जन्माच्या अभावी त्यातून उत्पन्न होणारे प्रारब्धही कुठून असणार?

वस्तुतः हा देह सुद्धा अध्यास (आरोपच) आहे आणि आरोपाला जन्म मृत्यु नसतो.

उपादानं प्रपञ्चस्य मृद्भाण्डस्येव कथ्यते।
अज्ञानं चैव वेदान्तैस्तस्मिन् नष्टे क्व विश्वता ॥९४॥

घटास घडवी माती जैसी विश्व तसे अज्ञाने।
अज्ञानाचा अस्तचि होता विश्व नासते ज्ञानीजना।

मातीच्या भांड्याचे उपादान कारण जशी माती, तसेच या प्रपंचाचे मूळ कारण अज्ञान हेच आहे आणि वेदांतामुळे अज्ञान नष्ट झाल्यावर (खंडन झाल्यानंतर) त्या अज्ञानापासून उत्पन्न होणारे विश्व हे तरी कुठून असणार?

© www.madhaveeraghuveer.com

वेदांतामुळे एकदा सर्व स्पष्ट झाले की इतर गोष्टी नाहीशा होतात.

यथा रज्जुं परित्यज्य सर्पं गृह्णाति वै भ्रमात्।
तद्वत् सत्यम् अविज्ञाय जगत् पश्यति मूढधीः॥६५॥

भ्रमता बुद्धि म्हणतो दोरी सर्प होऊनी राही।
मिथ्या विश्व सत्य म्हणे तो अज्ञानाने पाही॥६५॥

ज्याप्रमाणे संभ्रमामुळे दोरीला टाकून सर्पाचे आकलन होते. त्याप्रमाणे अज्ञानी, सत्य न जाणता जगालाच पाहतो. (जगाचे आकलन करतो.)

रज्जुरूपे परिज्ञाते सर्पखण्डं न तिष्ठति।
अधिष्ठाने तथा ज्ञाते प्रपंचः शून्यतां गतः॥६६॥

सत्यही जाणे दोर हा म्हणे, सर्पाभासहि टळतो।
ज्ञान ते जरी होय अंतरीं विश्वाभासही नुरतो॥६६॥

दोरीच्या खऱ्या रूपाचे ज्ञान झाले की तिच्या ठिकाणी सर्पत्व रहात नाही. त्याचप्रमाणे या प्रपंचाच्या मूळ अधिष्ठानाचे ज्ञान झाले की तो प्रपंच शून्याला जाऊन मिळतो. म्हणजेच प्रपंच खरा वाटत नाही. तो भास आहे हे स्पष्ट होते.



देहस्यादि प्रपंचत्वात् प्रारब्धास्थितिः कुतः।
अज्ञानिजन बोधार्थं प्रारब्धं वक्ति वै श्रुतिः॥६७॥

शरीर खोटे विश्व ही खोटे प्रारब्धही ते खोटे।
अज्ञान्याला जाणुनि घ्याया श्रुती वर्णिती परि ते॥६७॥

© www.madhaveeraghuveer.com

हा देहसुद्धा प्रपंचरूपच आहे. म्हणून त्याला प्रारब्ध गति कुठून असणार? अज्ञानी लोकांना समजावे यासाठी श्रुतींनी प्रारब्धाचा विचार मांडला आहे.

ज्ञानमार्ग स्वीकारला की प्रारब्ध उरत नाही. म्हणून प्रारब्धाचे निराकरण आपोआपच होऊन जाते. अज्ञानी माणसाला प्रारब्ध आहे आणि ज्ञानी माणसाला प्रारब्ध नाही असे श्रुतींनी सांगितले आहे.

व्यावहारिक सत्तेकडून पारमार्थिक सत्तेकडे जाताना प्रातिभासिक सत्तेचा आधार घ्यावा लागतो.

अज्ञानी लोकांना प्रारब्ध या शब्दाने दिलासा मिळतो. पुढे माणूस धरसोड करतो. एकादशी करून अपेक्षित फळ मिळाले नाही की चतुर्थी करायला लागतो. गणपती पावला नाही की दत्ताची आराधना करतो.

व्यवहारदृष्टीने श्रुती सांगते की बाह्य दृष्टीने प्रारब्ध असते. परंतु अंतर्दृष्टीने प्रारब्ध नसते.

क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ।
बहुत्वं तन्निषेधार्थं श्रुत्या गीतं च यत् स्फुटम् ॥८८॥

ज्ञान प्राप्त होता त्यांची नासती कर्मे सारी।
बहुत्व सुचवी येथ नासवी प्रारब्धासव सारी॥८८॥

या परात्पर स्वरूपाचे दर्शन होताच त्या साधक सिद्धाची सर्व कर्मे क्षय पावतात. म्हणून श्रुतीमध्ये जे काही स्फुट विचार सांगितले आहेत ते प्रारब्धाच्या निषेधार्थच सांगितले आहेत.

श्रुतीमध्ये सांगितलेले कैवल्य, मोक्ष यांचा साक्षात्कार झाला की कर्म उरतच नाही.

श्रुतीतील स्फुट वचन हे प्रारब्धाला महत्त्व देण्यासाठी नाही, तर त्याच्या निषेधार्थच सांगितले आहे.

© www.madhaveeraghuveer.com

उच्यतेऽज्ञैर्बलाच्चैतन्नदानर्थद्वयागमः।
वेदान्तमतहानं च यतो ज्ञानमिति श्रुतिः॥९९॥

प्रारब्ध उरते ज्ञान्या असे अज्ञाची बोलती।
विकल्प नुरतो वेदां जे सत्य ज्ञान सांगती॥९९॥

प्रारब्ध मानणे या अज्ञानाच्या शक्तीमुळे (अद्वय आगमात) दोन प्रकारे माणूस अनर्थात अडकतो. वेदांतातील जी मते आहेत ती टाकून दिल्याचा दोष येतो आणि ज्ञानाची हानि होते.

माझे रूप मला कळत नाही. मी सच्चिदानंद आहे. सर्व ब्रह्म आहे हे कळत नसल्यामुळे मी पारमार्थिक सत्तेखाली वावरत नाही, केवळ प्रातिभासिक व व्यावहारिक सत्तेचे हे सर्व अनर्थ आहेत.

योग विचार (साधन)

अपरोक्षानुभूति ही प्रारब्धावर नाही तर तुम्ही काय साधना करणार याच्यावर अवलंबून आहे.

त्रिपञ्चाङ्गान्यथो वक्ष्ये पूर्वोक्तस्य हि लब्धये।
तैश्च सर्वैः सदा कार्यं निदिध्यासनमेव तु॥१००॥

उपाय पंधरा होती ज्ञान हे मिळण्याप्रती।
आचरावे मुमुक्षूंनी नेमुनी व्रत निश्चये॥१००॥

पूर्वी सांगितले त्याच्या प्राप्तीसाठी आता १५ प्रकारची साधने सांगेन. त्या सर्व साधनांनी निदिध्यासन करावे. ९९ श्लोकात आतापर्यंत जे सांगितले आहे त्यातील १० - ११ श्लोक सारभूत आहेत.

उक्तसाधनयुक्तेन विचारः पुरुषेण हि।
कर्तव्यो ज्ञानसिद्ध्यर्थमात्मनः शुभमिच्छता॥१०॥
नोत्पद्यते विना ज्ञानं विचारेणान्यसाधनैः।
यथा पदार्थभानं हि प्रकाशेन विना क्वचित्॥१०२॥

© www.madhaveeraghuveer.com

ज्ञानप्राप्तिसाठी जीव-शिव ऐक्य व्हायला हवे. 'मी तेच आहे' हे ज्ञान होण्यासाठी ७५ साधने सांगतो. इथे निदिध्यासनाला 'सदा' ची जोड दिली आहे.

नित्याभ्यासादृते प्राप्तिर्न भवेत् सच्चिदात्मनः।
तस्मात् ब्रह्म निदिध्यासेत् जिज्ञासुः श्रेयसे चिरम्॥१०१॥

सत्य ज्ञान असे श्रेष्ठ एकमेवाद्वितीय जे।
दीर्घ यत्न निदिध्यास पाहिजे ब्रह्म गाठण्या॥
नित्यध्यासाविना श्रेष्ठ आत्मज्ञान घडेचिना।
प्रयत्ना सोडणे नव्हे ध्येय ते गाठल्याविना॥

नित्य अभ्यास केल्याशिवाय सच्चिदानंदाची प्राप्ति होणार नाही. म्हणून जिज्ञासुंनी शाश्वत श्रेयसासाठी ब्रह्माचा सदा निदिध्यास धरावा.

चिरम् श्रेयस — निःश्रेयस

सच्चिदानंदाशी एकरूप होण्यासाठी ब्रह्मविद्येचा अभ्यास करून ब्रह्मप्राप्ति करून घ्यायची.

असा निदिध्यास सतत असल्यामुळेच एकनाथ महाराजांना हरिजन मुलात, गाढवात ब्रह्मदर्शन घडले.

आपले वर्तन मात्र व्यवहाराशी निगडीत असते.

गुरुदेव रानडे प्राचार्य असताना क्रिकेट मॅच पहायला गेले म्हणून त्यांच्यावर टीका झाली. परंतु त्यांना सर्वत्र ब्रह्माचाच साक्षात्कार घडत होता.

अशीच एका सूफी संतानी कावळ्याला दाद दिली.

कशी रे तुला भेटू मला वाटे लाज!

त्यांना हे निदिध्यासन जमत नाही, त्यांना अध्यात्म अवघड वाटते. परंतु जे सतत त्या ब्रह्माशी जोडलेले असतात. त्यांना कोणत्याही स्थितीत त्या ब्रह्माचेच दर्शन घडत असते.

©www.madhuraveeraghuveer.com

यमो हि नियमस्त्यागो मौनं देशश्च कालतः।
आसनं मूलबन्धश्च देहसाम्यं च दृक्स्थितिः॥१०२॥

यमादि नियम त्याग मौन देशादि काळ ही।
आसने मूळबंधादि देहसाम्यी बघे दृढ॥१०२॥

प्राणसंयमनं चैव प्रत्याहारश्च धारणा।
आत्मध्यानं समाधिश्च प्रोक्तान्यङ्गानि वै क्रमात्॥

प्राणायामान्तरी साधी प्रत्याहार नि धारणा।
आत्मध्यान समाधी ही क्रमाने बोलिली असे॥१०३॥

यम, नियम, त्याग, मौन, देश, काल
आसन, मूलबंध, देहसाम्य, स्थिरदृष्टी
प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी।
साधन चतुष्टय हे शाब्दिक ब्रह्मप्राप्तिसाठी सांगितले आहे.
योगविचार हा वेदांताने सांगितला आहे.
अष्टांग योग हा पातंजल योग आहे.
योगस्तु चित्तवृत्तिनिरोधः — सर्व चित्तवृत्ति ब्रह्मामध्ये लीन झाल्या पाहिजेत.
अग्निपुराणात आलेली योगाची व्याख्या अशी आहे —
आत्मप्रयत्नसापेक्षा विशिष्टा या मनोगतिः।
★ तस्या ब्रह्मणि संयोगो योग इत्यभिधीयते॥

मनाला अंतर्मुख करून परब्रह्मस्वरूपाच्या ठिकाणी स्थिर केले जाणे या स्थितीला योग असे म्हणतात.
समाधि ही दुःखाचा परिहार करण्यापुरती आहे.
ही सविकल्प समाधिपर्यंत नेते.
१०२, १०३-वरील मंत्रात मात्र जीवन्मुक्ती / किंवा निर्विकल्प समाधि अपेक्षित आहे. पंचदशांग योग हे नाव तेजोबिंदूपनिषद यातून आले आहे.

© www.madhuveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

MARCH - 2015

सर्वं ब्रह्मेति विज्ञानात् इंद्रियग्रामसंयमनात्।
यमोऽयमिति संप्रोक्तोऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः ॥१०॥

निग्रही इंद्रिये सारी सर्व हे ब्रह्म जाणुनी।
यम नामे तया जाणी अभ्यासावा पुनः पुनः ॥१०॥

सर्व ब्रह्म आहे असे ज्ञान झाल्यामुळे इंद्रिय समूहाचा संयम करणे याला यम असे म्हणतात. त्याचा वारंवार अभ्यास करावा.

इंद्रिये विषयांकडे धावत असतात. परंतु त्या विषयांमध्ये ब्रह्म पहायला शिकायला हवे.

विषयांशी संबंध आल्यानंतर ते जसे आहेत तसे स्वीकारणे आणि त्यांच्याबद्दल द्वैत भाव उत्पन्न होऊ न देणे (रागद्वेष) याला इंद्रियसंयम म्हटले आहे.

सुगंध/दुर्गंध वाऱ्याबरोबर येत असतो. त्याविषयी समभाव बाळगावे.

'आजच्यासारखे उद्या मिळो' अशी इच्छा करणे हे चूक आहे. जे जसे मिळेल तसे स्वीकारता यायला हवे. Accept it as it is! अशी वृत्ति हवी.

यती व्हायचे का ययाती व्हायचे? मुद्दाम ठरवून कोणतीच गोष्ट करायची नाही. नसेल्या तसे स्वीकारून वृत्ति उठू न देणे हा संयम आहे. निदिध्यास!

गुरु अवशिष्ट देतात, उच्छिष्ट नाही.

कोणत्याही पदार्थाचा नैवेद्य दाखवून उरलेला पदार्थ खाणे हा प्रसाद आहे.

© www.madhaveeraghuveer.com

फुलणे ही प्रक्रिया असते. गाईच्या शेणामध्ये जंतुनाशक शक्ती असते म्हणून जमीन सारवण्याची पद्धत आहे. पृथ्वी ही निसर्गत: गंधवती आहे. प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी पृथ्वीचे सान्निध्य हवे.

यम - अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह.
नियम - शौच, संतोष, स्वाध्याय, श्रद्धा, ईश्वरप्रणिधान
संयम - ध्यान, धारणा, समाधि.

अध्यात्माशिवाय योगसाधना ही नुसती कसरतीचा खेळ होऊन बसतो.

वनस्पतिविश्वात सुद्धा बीज, अंकुरण, फुलणे ही बाह्य साधना मानली तर फलनिर्मिती ही अंतरंग साधना आहे.

योगाचा खरा अर्थ जीव-शिव ऐक्य हाच आहे. योग करायचा नसतो तर तो घडावा लागतो.

सजातिसप्रवाहश्च विजातीय तिरस्कृतिः।
नियमो हि परानन्दो नियमात् क्रियते बुधैः॥१०५॥

विचार एक मी ब्रह्म दुसरा कोणीही नसे।
म्हणावे नियमा त्यासी अति आनंद देतसे॥१०५॥
जसे ब्रह्म असे आत्मा तोही मीच स्वत: असे।
राहणे असती त्यांचा जसे ऐसा विचार तो॥१०५॥

सजातीय प्रवृत्तीचा प्रवाह वाहत ठेवणे, विजातीय प्रवृत्तीचा तिरस्कार करणे हाच अत्यंत आनंदप्रद नियम आहे. साधकांनी याचा नित्य अभ्यास करावा.

सर्वं खलु ब्रह्म' या दृष्टीने विचार सतत चालू राहणे आहे सजातीय आणि याच्या विरुद्ध म्हणजे विक्षेपभोगाचे चिंतन हे विजातीय प्रवाह आहेत. असा हा नियम परमानंद देणारा आहे आणि बुधजन त्या नियमानुसारच आचरण ठेवतात.

© www.madhaveeraghuveer.com

स्वप्नात सुद्धा त्याच्या विरुद्ध न जाणे आणि
कोणताही अपवाद न करता विजातीयाबद्दल सतत
तिरस्कार वाटणे – बुध, साधक, ज्ञानी जाणकार
प्रवृत्ति – प्रधान वृत्ति तर निवृत्ति – निश्चयी वृत्ति
'बोले तैसा चाले' ही त्यांची प्रवृत्ति असते.

त्यागः प्रपंचरूपस्य चिदात्मत्वावलोकनात् ।
त्यागो हि महतां पूज्यः सद्यो मोक्षमयो यतः ॥१०६॥

परब्रह्म चिदानन्दाचे जेव्हा अवलोकन केले जाते
तेव्हा असत जडचा (प्रपंचाचा) त्याग होतो. विश्वात
असलेल्या, प्रत्यक्ष आहे असे वाटणाऱ्या पण भासमान
असणाऱ्या वस्तूंचा मनःपूर्वक त्याग (आणि चैतन्य
हेच ब्रह्म आहे असा पूर्ण विश्वास) याचेच नाव
त्याग आहे. त्याग हा तत्काळ मोक्षदायक आहे.

त्याग या दृश्य विश्वाचा सत्य ब्रह्मचि जाणुनि ।
तत्काळ पावव्या मोक्ष ज्ञानी गौरविला असे ॥१०६॥

त्याग म्हणजे बाजूला राहणे, निःसंग राहणे, चिकटून न राहणे.
इदं न मम हे दानातील सूत्र त्यागालाही
लागू होते. त्याग जेव्हा कर्म होते तेव्हा त्यातील
आसक्ती संपत नाही. कारण कर्तृत्व-भोक्तृत्व शिल्लक
असतेच. देशासाठी त्याग करणे व त्याचे Returns मागणे
यामध्ये त्याग कर्मच असतो. त्याग हा ज्ञानपूर्वक
असायला हवा. त्याग ही वृत्ति आहे. असा हा त्याग
सज्जनांनाही पूजनीय असतो. त्यामध्ये मोक्षच प्रधान आहे
राजा शिखिध्वज – राणी चूडाला (विवेकी, चिंतनशील)
राणी – श्रवण मनन ध्यानधारणा. राजाचे मन त्यात लागत नसे
काही दिवसांनी राजाला विरक्ती – अरण्यात कुटी बांधून राहतो.
काही महिन्यांनी राणी वेष पालटून येते तेव्हा

राजा आपल्या त्यागाबद्दल पुष्कळ वर्णन करून सांगतो. तेव्हा राणी म्हणते. हे परिवर्तन आहे, हा त्याग नाही. या त्यागात सुद्धा 'मी' जागा आहे. खरा त्याग म्हणजे वैराग्य! राजाला यातील मर्म उमगले. राजा सावध झाला. आणि खरोखरच त्याला विरक्ती आली. कोणत्याही सुख दुःखाबद्दल राग-द्वेष वाटेनासा झाला. आणि तेव्हा राणीने त्याला पुन्हा राजमंदिरात बोलावले आणि राजाने त्याला संमति दिली. कारण आता त्याच्यासाठी अरण्य आणि महाल दोन्ही समानच झाले होते. पुढे याच निरहंकार वृत्तीने राज्यकारभार सांभाळला व तो राजयोगी झाला. कमळपत्राप्रमाणे त्या वैभवात राहून अलिप्त राहिला. साक्षीभावाने रहाता आले तर कशाचाही लेप लागत नाही. इतकेच नाही, तर मी त्याग केला. अशी भावना देखील लोप पावते.

## ४ थे साधन मौन

यस्मात् वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह।
यन्मौनं योगिभिर्गम्यं तद् भवेत् सर्वदा बुधैः ॥१०७॥

जेथूनि परते वाचा मनासंगे असाध्य जे।
ते मौन साध्य योग्यांसी आचरावे मुमुक्षुंनी ॥१०७॥

ज्या गोष्टीपासून मनासह वाचा माघारी फिरते (कारण ते प्राप्त होणे कठीण आहे) असे जे मौन ते योग्यांनाच समजू शकते. बुद्धिमान माणसांनी तसे राखण्याचा सदैव प्रयत्न करावा.

© www.madhaveeraghuveer.com

17 APRIL 2015 FRIDAY

(107-258) WK 16

वाचो यस्मात् निवर्तन्ते तद् वक्तुं केन शक्यते।
प्रपंचो यदि वक्तव्य: सोऽपि शब्दविवर्जित:॥१०८॥

जेथुनि परते वाचा वर्णावे ब्रह्म ते कसे।
वदावे विश्व हे कैसे शब्द तेथे पुरेचिना॥१०८॥

स्वामी स्वरूपानंद म्हणतात—
सदा थांबवी निज गुंजारव जसा भ्रमर मधुपानी।
आत्मानुभवी तसे राखते संतत मौन धरोनि॥
इंद्रिय-वृत्ती विलीन होती हृदयाच्या एकांती।
जिवा शिवाची पडता गाठी होय तोचि सुख म्हणती॥

ज्याच्यापासून वाणी परावृत्त होते ते बोलणे कोणाला शक्य आहे का! जरी प्रपंचाबद्दल बोलायचे असले तरी तो सुध्दा शब्दातीत आहे.

इति वा तद् भवेत मौनं सतां सहजसंज्ञितम्।
गिरा मौनं तु बालानां प्रयुक्तं ब्रह्मवादिभि:॥१०९॥

वाचा ही अपुरी आहे वर्णाया दोन्हीही इथे।
श्रेयस्कर असे बाला यासाठी मौन राखणे॥१०९॥

हे जे मौन आहे ते सहज निर्माण झालेले मौन आहे. वाणीचे जे मौन आहे ते बालांचे (अल्पबुद्धी अज्ञानी) आहे. ब्रह्मवाद्यांचे हे मौन वेगळे (अयुक्त-पांडित्य) आहे. ज्याच्याबद्दल चर्चा न करता जे मौनातूनच समजते सहजपणे जीवनात मिसळून गेलेले असते. एकदा मोक्षमय झाल्यावर चर्चा कसली?

## ५ वे साधन - विजनदेश

आदावन्ते च मध्ये च जनो यस्मिन् न विद्यते।
येनेदं सततं व्याप्तं स देशो विजनः स्मृतः॥११०॥

एकांत स्थानं जेथे की जाणे-येणे कदाचित।
अशा स्थानासि वर्णिले देश ध्यानास योग्य तो॥११०॥

ज्याच्या आधी, मध्य व अंती भूतमात्र असत नाहीत परंतु जो सर्वदा व्यापलेला असतो तो देश विजन होय. ज्या ठिकाणी लोक असूनसुद्धा ब्रह्मतत्वाचे प्राधान्य जाणवते ही साधकाची देहस्थिति आहे तिथे एकांत जाणवतो. त्याच्या वृत्ती अलिप्त असतात. त्यांच्याशी जनसंपर्क नसतो.

जन विजन झाले आम्हा।

वृत्तिंची निवृत्ती झाली की जन विजन होते.

विविक्तदेशसेवित्व। विविक्तसेवी लघ्वाशी - गीता.

## ६ वे साधन - काल

कलनात् सर्वभूतानां ब्रह्मादीनां निमेषतः।
कालशब्देन निर्दिष्टो ह्यखण्डानन्दकोऽद्वयः॥१११॥

ब्रह्मादि सर्व लोकांसी घडवी मोडवी क्षणी।
अखण्डानन्द जे ब्रह्म काळ नामेचि वर्णिले॥



ब्रह्मादि सर्व भूतमात्रे जो क्षणात आवरून घेतो तो परमात्माच अखंड, आनंदरूप, अद्वय असून काल शब्दाने त्याचा निर्देश केला जातो.

~~ब्रह्म~~ ज्याचे आदि आहे ते सर्व ब्रह्मापासून मुंगीपर्यंत (सर्व सृष्टी) सर्वांना ग्रासून टाकतो. शेवटी उरते काय? तर ब्रह्मतत्व! योगसाधनेने जेव्हा प्रपंच आवरून घेण्याची योग्याची स्थिति येते तेव्हा जे उरते ते अखंड, एकरसात्मक ब्रह्मच!

१५ जून २०१८





## ७ वे साधन - आसन

सुखेनैव भवेत् यस्मिन् अजस्त्रं ब्रह्मचिन्तनम्।
आसनं तद् विजानीयात् न इतरत् सुखनाशनम्॥

अजस्त्र ब्रह्म चिंतावे सातत्ये श्रमल्याविण।
सुखनाशी असे नव्हे जाणावे त्यास आसन॥११२॥

ज्या आसनामध्ये सतत दीर्घकालपर्यंत ब्रह्मचिंतन करत बसता येईल तेच खरे आसन (सुखासन) आहे. ज्या आसनामुळे सुखाचा नाश होतो (कष्ट होतात) ते निरुपयोगी होय.
व्यक्तिविशिष्टाने ते बदलत जाऊ शकते. परंतु सहसा आसन बदलण्याची वेळ येता कामा नये. आसन अनुकूल असावे.
ज्या आसनामध्ये ब्रह्मचिंतनाचे सुख मिळते ते खरे आसन।
उन्मनी अवस्थेतील आसन अगदी निजून केले तरी चालते.

सिद्धं यत् सर्वभूतादि विश्वाधिष्ठानमव्ययम्।
यस्मिन् सिद्धाः समाविष्टास्तद् वै सिद्धासनं विदुः॥

असे मूळचि भूतांचे नसा आधार या जगा।
सामावी सर्व सिद्धांसी सिद्धासन म्हणे तया॥११३॥

हे सर्व चराचर विश्वाचे अधिष्ठान अव्यय, अक्षय नित्यसिद्ध आहे. ज्याच्यात सिद्ध पुरुष समाविष्ट होतात त्याला सिद्धासन म्हणून ओळखले जाते.
(कदाचित ही वृत्ति स्वामी की निजून तो ठरणारही, समाविष्ट - वेगळेपण उरत नाही. सिद्धांचे जे साध्य ते साधकाचे साधन असते.

©www.madhaveeraghveer.com

## ८. मूलबंध

यन्मूलं सर्वभूतानां यन्मूलं चित्तबन्धनम् ।
मूलबन्धः सदासेव्यो योग्योऽसौ राजयोगिनाम् ॥११४॥

चराचरास जे मूळ मूळ जे चित्तबंधना ।
मूळबंध सदासेवी राजयोग्यांस योग्य जो ॥११४॥

सर्व प्राणिमात्रांचे जे मूळ तसेच चित्त बंधनाचे जे मूळ ते मूळबंध म्हणून समजावे. राजयोग्यांनी याचे सदैव सेवन करावे.

वायुच्या गतीला आतबाहेर रोखणे म्हणजे बंध ।

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥९.३४॥

इथे साधना उलट्या क्रमाने साधायची आहे.

प्राणेऽपानं तथापरे । इथे अपान वरच्या दिशेला जाऊन प्राणात जाऊन मिळतो.

अहंकार बुद्धि संपूर्णपणे बंधनात गेली पाहिजे म्हणजे अहंकाराचा बुद्धीत लय झाला पाहिजे. म्हणजे तो निश्चयात्मिका बुद्धी (तेजतत्त्वाकडे) जातो. चित्ताचा मनात व अहंकाराचा बुद्धीत लय होतो.

पातंजल योगातील बंध हे शरीरस्वास्थ्यासाठी आहेत, परंतु हे बंध परमतत्त्वापर्यंत नेणारे आहेत.
(मामेवैष्यसि)

## ९. देहसाम्य

अंगानां समता विद्यात् समे ब्रह्मणि लीनताम् ।
नो चेत् नैव समानत्वमृजुत्वं शुष्कवृक्षवत् ॥११५॥

देहसाम्य घडे जेव्हा गात्रांची ब्रह्मलीनता ।
अन्यथा बसणे ताठ शुष्कवृक्ष समान की ॥११५॥

© www.madhaveeraguveer.com

मूळची जी विषय अंगे आहेत, ती ब्रह्मरूप झाल्यावर सम झाली असे जाणावे. परंतु तसे समत्व येत नसेल तर वठलेल्या वृक्षाप्रमाणे ते ऋजुत्व काही खरे नाही.

मान मस्तक आणि कंबर ही एका रेषेत आली पाहिजेत. समं कायशिरोग्रीवं म्हणजे शरीराला मऊपणा येतो. (लवचिकता) हा शारीरिक फायदा आहे. ब्रह्मचिंतन करताना मूळबंध साधला असता हो ब्रह्मात लीन झाल्यावर आपोआप साधकाच्या शरीरावर (चालण्या बोलण्यात) एक प्रकारचे मार्दव येते. मात्र असे जर होत नसेल तर ते समनत्व हे वठलेल्या वृक्षाप्रमाणे समजावे.

**१० स्थिरदृष्टी**

दृष्टिं ज्ञानमयीं कृत्वा पश्येत ब्रह्ममयं जगत।
सा दृष्टिः परमोदारा न नासाग्रावलोकिनी॥११६॥

ज्ञानपूर्ण करी दृष्टी ब्रह्म सर्वत्र पाहुनी।
बघते फक्त नासाग्री नसे ती दृष्टि सोज्वळ॥११६॥


दृष्टि - दर्शन - दृश्य या त्रिपुटीचा जिथे लय होईल तिथेच दृष्टी ठेवावी. नुसती नासाग्री दृष्टी लावणे खरे नाही. चर्मचक्षुने नाही तर ज्ञानचक्षुने जगाकडे पहायला हवे. ब्रह्मरूप जगाकडे पहावे. सर्व खल्विदं ब्रह्म। ही सर्वात श्रेष्ठ दृष्टी आहे.

नुसती नासाग्र दृष्टी केल्याने भ्रम होतो. डोके दुखते. कित्येकदा मेंदूवर परिणाम होऊ शकतो.

नासाग्र हे प्राणवायुचे स्थान आहे.

सर्व सृष्टीत पसरलेले चित आणि तुमचे चित्त एकरूप होऊन जायला हवे. हालचाल हे चैतन्य तर जाणीव हे चित्त आहे. चित - चित्त - चैतन्य

© www.madhaveeradhuveer.com





प्राणतत्त्वाशी जेव्हा एकत्व साधता येते तेव्हा जाणिवशक्ती प्रबळ होते. — ब्राह्मी स्थिति.

परमात्मा प्रभु अंतर्यामी नित्य प्रकाशे हृदयात
दृश्याआधी द्रष्टा साक्षी दृष्टी जाहो जगतात।
चित्ती जगती परमात्म्याविण अन्य न दर्शन दृष्टीते
महापुरुष हा बोला बोला तथास्तु तथास्तु तथास्तु ते॥

अशी दृष्टी असणे हे योगांग साधन आहे.

दृष्टि दर्शन दृश्यानां विरामो यत्र न भवेत्।
दृष्टिस्तत्रैव कर्तव्या न नासाग्रावलोकनी॥११७॥

अथवा लावुनि दृष्टी असंगताचि केवळ।
दृष्टी अशी पहावे की फक्त नासाग्र ना बघे॥

चित्तादिसर्वभावेषु ब्रह्मत्वेनैव भावनात्।
निरोधः सर्ववृत्तीनां प्राणायामः स उच्यते॥११८॥

चित्ताच्या सर्व वृत्तीत देखे ब्रह्मचि एकले।
निरोध सर्ववृत्तींचा प्राणायामचि बोलला॥११८॥

अंतःकरणातील सर्व भावभावनांचा लोप होऊन तेथे केवळ ब्रह्मैकत्वाची वृत्ति उरते. इतर सर्व वृत्तींचा निरोध होतो. (त्या ब्रह्मात लय पावतात) त्याला प्राणायाम म्हणतात.

आयाम - विस्तार - प्राणांचे Expanssion.

श्वास-उच्छ्वास लांबवणे. श्वास प्रश्वास गति विच्छेद पातंजल शास्त्र शारीराशी निगडित आहे.

© www.madhaveeraghuveer.com

इथे पू. शंकराचार्य त्याच्याही पुढची पायरी सांगतात. सर्व वृत्ति-भावभावना ब्रह्माशी एकरूप होणे हाच प्राणायाम आहे.

भावनांच्या उद्रेकावर श्वास अवलंबून असतो. त्याचप्रमाणे श्वासावर भावनांचा आवेग अवलंबून असतो. ∴ श्वासावर नियंत्रण आले की भावना आवरता येतात.

पातंजल योगसूत्रात Respiratory track आहे.

या मंत्रात 'एव' या शब्दाला महत्त्व आहे. केवळ ब्रह्मभावावरच लक्ष केंद्रित व्हायला हवे.

या प्राणायामाच्या माध्यमातून पतंजलीने कर्मयोग तर शंकराचार्यांनी ज्ञानयोग सांगितला आहे.

प्राण + अपानाची गाठ पडली म्हणजे ग्रंथिभेद होतो.

बाह्यरंगाकडून अंतरंगाकडे जाणे म्हणजेच

अपाने जुह्वति प्राणं प्राणान्.

बाह्यवृत्तींचे अंतर्वृत्तीमध्ये हवन करायचे. म्हणजेच संसारात आसक्त असणाऱ्या चित्ताला अखंड ब्रह्मतत्त्वाशी एकरूप करायचे. म्हणजे शांत, प्रसन्न, आनंदी, संयमित जीवनाची अनुभूति येते. नरीच वृत्ती, स्वभाव बदलायला लागतो. हे निदिध्यासाचे लक्षण आहे.

निषेधनं प्रपञ्चस्य रेचकाख्यः समीरणः ।
ब्रह्मैवास्मीति या वृत्तिः पूरको वायुरीरितः ॥११९॥

निषेध दृश्य विश्वाचा नामे रेचक बोलिला ।
विचार मी असे ब्रह्म यासी पूरक वर्णिला ॥११९॥

प्रपंचाचा निषेध हा रेचक वायु व मी ब्रह्म आहे या वृत्तिला पूरक वायु म्हणतात.

© www.madhavveeraghuveer.com

$CO_2$ अधिक असलेला मलिन वायु बाहेर टाकणे आणि $O_2$ सारखा आवश्यक/शुद्ध वायु आत घेणे. ही क्रिया प्राणायामात घडायला हवी. ब्रह्म एव आस्मि हे त्याचे पोषण आहे. प्रपंच शब्दात माया आहे. संपूर्ण मायेचा निरोध होत नाही तोवर बाहिर्वृत्ती थांबणार नाही.

११ प्राणायाम

तत्स्तद् वृत्तिनैश्चल्यं कुम्भकः प्राणसंयमः।
अयं चापि प्रबुद्धानामज्ञानां घ्राणपीडनम्॥१२०॥

सातत्य या विचाराचे त्याचे कुंभक वर्णन।
प्राणायाम प्रबुद्धांचा अज्ञान्या नाकपीडन॥१२०॥

पुरक-रेचक वृत्ति निश्चल करणे याकाय प्राणांचे संयमन म्हटले आहे त्याला कुंभक अशी संज्ञा आहे. हा अर्थ ज्ञानी लोकांसाठी आहे. परंतु अज्ञानी लोकांसाठी नुसते नाक दाबून ठेवणे (नाकाला त्रास देणे) आहे. ती नुसती कसरत आहे. त्याने काहीच साध्य होणार नाही.

वस्तुतः वृत्तिनिरोध हवा. जीव-शिवाचे ऐक्य हवे. ते नसेल तर योग अपुरा असतो.

पातंजल योग हा अपरोक्षानुभूतीचे साधन होऊ शकेल पण तो म्हणजे अनुभूति नव्हे. 

कुंभ शब्दात धारणाशक्ती आहे. परंतु तो निश्चल असावा लागतो. इथे कुंभ शब्द वापरला आहे. घट शब्द वापरला नाही. या साधनेला ॐ काराची जोड हवी. ४-१६-८ असे प्रमाण हवे. ही योगिक प्रक्रिया आहे. कुंभकाच्या मदतीने प्राण रोखून धरता येतो. ... मरेपर्यंत काशी असे म्हणतात. आपुले मरण वैराग्याच्या शेणी —— तुकाराम महाराज.

## १२. प्रत्याहार

विषयेषु आत्मता दृष्ट्वा मनसश्चिति मज्जनम्।
प्रत्याहारः स विज्ञेयोऽभ्यसनीयो मुहुर्मुहुः।मुमुक्षुभि

संपूर्ण लय चित्ताचा देखे सर्वत्र ब्रह्म ही।
प्रत्याहार म्हणावे त्या अभ्यासावे मुमुक्षुनी॥१२१॥

हे सर्व विषय आत्मा आहेत असे मानून ते सर्व प्रत्यगात्मामध्ये बुडवून टाकावेत यालाच प्रत्याहार म्हणतात. मुमुक्षूंनी त्याचा वारंवार अभ्यास करावा.
शब्द, स्पर्श इ० विषय आत्मा आहेत असे समजून बुडवून टाका. पाण्यामध्ये साखर विरघळून टाकली की नुसत्या साखरेचा आस्वाद/आनंद घेता येत नाही. पाणीच गोड होऊन जाते. आता विषय हे विषय उरत नाहीत. ते ब्रह्मच होऊन जातात. (पतंजली-सूत्रानुसार) प्रत्याहार म्हणजे माघारी फिरणे. इथे विषयांकडे भोग म्हणून पाठ फिरवली परंतु ब्रह्म म्हणून स्वीकार केला. ही सर्व वाटचाल पुष्परूपापर्यंत आली. आता केवळ फळच शिल्लक राहिले.

## १३ धारणा

यत्र यत्र मनो याति ब्रह्मणस्तत्र दर्शनात्।
मनसो धारणं चैव धारणा सा परा मता॥१२२॥

मनाचे स्थैर्य जाणावे 'धारणा' ही म्हणे तया।
वस्तुमात्री घडे त्यासी सारे हे ब्रह्मदर्शन॥
जाई मन जिथे तेथे पाही ब्रह्मास सर्वदा।
चराचरी घडे त्यास ब्रह्मदर्शन यापरी॥१२२॥

ज्या ज्या ठिकाणी मन धाव घेते, त्या त्या ठिकाणी ब्रह्माचेच दर्शन होत आहे. अशी मनाची धारणा करावी. हीच धारणा सर्वश्रेष्ठ आहे.

©www.madhaveeraghuveer.com

श्री. रामकृष्ण परमहंसांना भुलवण्यासाठी एक गणिका आली तेव्हा ते म्हणाले, "माते, तुला आज मला या रूपात दर्शन द्यावेसे वाटले का?"

धारणा म्हणजे आधार। सर्वच गोष्टींना ब्रह्माचा आधार आहे. ब्रह्म हेच जीवनाचे अधिष्ठान आहे.

प्रत्याहारमध्ये माघारी फिरणे आहे तर धारणेमध्ये नित्यस्थिति आहे.

'ब्रह्मावाचून दुसरे काहीच नाही' ही मनोधारणा हे साधनेचे शिखर आहे.

पतंजल योगाने सबीज समाधिपर्यंत जाता येते, तर आचार्य इथे साधकांना निर्बीज समाधिपर्यंत नेतात.

ध्यानधारणा हा निदिध्यासनाचा कळस आहे.

## १४. ध्यान

ब्रह्मैवास्मीति सद्वृत्त्या निरालम्बतया स्थितिः।
ध्यान शब्देन विख्याता परमानन्ददायिनी॥१२३॥

ब्रह्म केवळ मी आहे हा विचार सुनिश्चित।
वर्णिला ध्यान शब्दाने परमानंद देतसे॥१२३॥

## १५. समाधि

निर्विकारतया वृत्त्या ब्रह्माकारतया पुनः।
वृत्ति विस्मरणं सम्यक् समाधिर्ज्ञान संज्ञकः॥१२४॥

निर्विचार मनोवृत्ति ब्रह्माकाराचि जाहली।
विस्मृती अन्य वृत्तीची समाधी ज्ञान मानिली॥
संकल्प पुढचे नाही विसरे सर्व मागचे।
होई स्थिति अशी जेव्हा समाधी म्हणती तिला॥१२४॥

जेथ पुढील पैस पारखे। मागील स्मरावे ते ठाके।
ऐसिये सरिसीये भूमिके। समाधी राहे॥

© www.madhaveeraghuveer.com

ज्या ठिकाणी पुढील पाऊल टाकणे बंद होऊन मागीलही काही आठवत नाही. अशा समान भूमिका रूप समाधीवर तो पुरुष राहतो.

शनैः शनैरुपरमेत् बुद्ध्या धृतिगृहीतया।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिन्तयेत्॥

१२३— मी ब्रह्म आहे या सद्वृत्तिने जिला कशाचा आधार लागत नाही अशी जी निरालम्ब स्थिति होय ध्यान शब्दाने प्रसिद्ध असून ती परमानंद देणारी आहे. ध्यानाला आलंबनाची गरज नाही. मी ब्रह्मच अशी सद्वृत्ति निर्माण होते. धारणेला कशाचे तरी अधिष्ठान लागते. मनाची/बुद्धीची धारणा असते. सच्चिदानंदाशी एकरूप झालेली वृत्ति — सद्वृत्ती।

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे
त्या त्या ठिकाणी निज रूप तुझे।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी
तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही॥

ही अवस्था देखील अलीकडची आहे. कारण कुठेतरी जायचे आहे. जेव्हा 'कामली समाधि' अशी अवस्था होते तेव्हा ध्यानाचा विषय आत्मानंद / ब्रह्मानंद होतो.

१२४— सर्व प्रकारचे विकार टाकून वृत्ति ब्रह्ममय करायची. आणि पुन्हा तिचे विस्मरण करायचे यालाच 'समाधि' असे ज्ञानपरिपूर्ण नाव आहे. जोपर्यंत वृत्ति शिल्लक आहे तोवर सबीज सविकल्प समाधि आहे. आणि आम्ही त्यापुढेही जाऊन त्याचेही विस्मरण झाले की निर्विकल्प समाधि होते. हे १५ वे योगांग आहे.

© www.madhaveeraghuveer.com

विवेकचूडामणि मध्ये ३५४ ते ३६२ या समाधिचे वर्णन आले आहे.

ध्यानामुळे वृत्त्यानंद मावळतो व सुखाचा आनंदकंद गवसतो. परंतु जर द्वैतभान हरपले नाही तर ती ध्यानसमाधि होत नाही.

सद्वृत्तिमध्ये द्वैत शिल्लक असते. जोवर द्वैताचा निरास होत नाही तोवर ती निर्विकल्प समाधि नाही.

इमं चाकृत्रिमानन्दं तावत् साधु समभ्यसेत् ।
वश्यो यावत् क्षणात् पुंसः प्रयुक्तः सन् भवेत् स्वयम् ॥

साधके आचरावे हे व्रत स्वानन्ददायक ।
जोवरी संयमी शीघ्र इच्छामात्रेचि मेळवी ॥३२५॥

या अकृत्रिम आनंदाचा तोपर्यंत वारंवार (साधुंनी) अभ्यास केला पाहिजे की जेव्हा अभ्यासक कोणत्याही प्रयत्नाशिवाय जेव्हा हवा तेव्हा आनंद निर्माण करण्यात वाकबगार होईल.

समाधि हा अकृत्रिम आनंद आहे. तो सहजानंद आहे. हे अद्वैताचे शिखर आणि ज्ञानाची परिसीमा आहे. मनुष्य जन्माचे, सद्गुरु कृपेचे, ईश्वर कृपेचे ते सर्वोच्च शिखर आहे. यापुढे आता मिळवण्यासारखे जगात काहीच उरत नाही. ही स्थिति प्राप्त करणारा मनुष्य हा पुरुषोत्तम असतो.

ततः साधननिर्मुक्तः सिद्धो भवति योगिराट् ।
तत्स्वरूपं न चैतस्य विषयो मनसो गिराम् ॥३२६॥

नैष्कर्म्य सिद्धी योगेंद्र पावे पूर्णत्व साधुनि ।
वर्णावी श्रेष्ठता कैसी मन वाचादि साधनी ॥३२६॥

© www.madhaveeraghuveer.com

स यो ह वै तत्परमं ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति।
(३.२.९) जो कोणी मी ब्रह्मच आहे असे मानतो तो ब्रह्मच होतो. असे मुण्डकोपनिषद सांगते.
तर तैत्तिरीय (२.९) मध्ये म्हटले आहे —
यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह।
आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कुतश्चन॥
भगवद्गीता ६-३ मध्ये सांगतात —
आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते॥

यानंतर साधनापासून मुक्त झालेला साधक हा योगिश्रेष्ठ बनतो. त्या सिद्धाचे ते स्वरूप असते. जो मनाचा किंवा वाणीचा विषय होऊ शकत नाही.
त्यालाच योगिराज म्हणतात. — गुळवणी महाराज, प. पू. वासुदेवानंद सरस्वती!

समाधौ क्रियमाणे तु विघ्नान्यायान्ति वै बलात्।
अनुसन्धानराहित्यमालस्यं भोगलालसम्॥ १२७॥

समाधी साधण्या मार्गी विघ्नबाधा बहु असे।
अनुसंधानची खोड वांछा भोगात आळस॥१२७॥

अशा रीतीने समाधीची प्रक्रिया सुरु असताना दैववशात विघ्ने आडवी येतात. त्यांचा परिणाम म्हणून अनुसंधान सुटते. आळस वाढतो आणि भोगाची इच्छा उत्पन्न होते. असे अनेक सिद्ध पुरुष घसरतात. चांगदेवांच्या सिद्धी त्यांच्या मार्गात अडथळा झाल्या.
युक्तः कर्मफलं त्यक्त्वा ---- फले सक्तो निबध्यते। ५.१२
नात्यश्नतस्तु ------ जाग्रतो नैव चार्जुन॥ ६.१६
असंशयं महाबाहो ---- वैराग्येण च गृह्यते॥ ६.३५
असंयतात्मना योगो ---- शक्योऽवाप्तुमुपायतः॥ ६.३६

© www.madhaveerahuveer.com

लयस्तमश्च विक्षेपो रसास्वादश्च शून्यता।
एवं यद्विघ्नबाहुल्यं त्याज्यं ब्रह्मविदा शनैः॥१२८॥

निद्रा, औदास्य विक्षेप आसक्ती जी रसामध्ये।
वैफल्यादि अशी विघ्ने टाळावी साधके स्वये॥१२८

लय, तम, विक्षेप, रसास्वाद, शून्यता अशा तऱ्हेच्या विघ्नांचा ब्रह्मविद् साधकाने हळूहळू त्याग करावा. ध्यान, धारणा, समाधि या काळात ही विघ्ने उत्पन्न होतात. कषाय ही वृत्ति आहे. ध्यानावस्थेपासून हलणे हा कषाय आहे. लय - हळूहळू निद्रा येते तंद्री लागते, त्यातच समाधान वाटू लागते. त्यातून त्याला पुन्हा बोधावर आणणे आवश्यक आहे, कारण ही विघ्नेच आहेत. विक्षेप - पुन्हा पुन्हा विषयांचे स्मरण होते.

(१) लये सम्बोधयेत् चित्तम् - ध्यान लागत असताना उत्थान होते.

रसास्वाद - विशिष्ट आनंद वाटू लागतो. बाह्य रसाप्रमाणे या रसाचा स्वाद घेण्याची प्रवृत्ति वाढते. त्यातून तो पूर्णत्वाला जाण्याऐवजी शून्यत्वाला जातो. ही विघ्ने प्रतिबंध रूपाने समोर येतात.

गौडपादाचार्य — विक्षेप - विषयांच्या स्मरणाने चित्त विक्षिप्त होणे. मन भरकटणे.

(२) विक्षिप्तं शमयेत् पुनः। मनोनिग्रह म्हणजे शम। त्याचा संदर्भ घेऊन पुनः शब्द वापरला आहे. शिष्याची पारख करून गुरु पुन्हा सत्संग, जप, उपासना वाढवायला सांगतात.

(३) रसास्वाद - चित्त सविकल्प आनंदात मग्न होऊन आत्म्याला विसरते. मी कोण हे विसरून जातो व त्या आनंदाची चटक लागते.

न आस्वादयेत् रसम् तत्र निःसंगः प्रज्ञया भवेत्। कोणताच संग नको. अगदी सत्संगही नको.



© www.madhaveeraghuveer.com

कषाय म्हणजे शून्य.

(4) समं प्राप्य न चालयेत्।

ब्रह्माशी एकरूप होणाऱ्या चित्ताला भिऊन माघारी फिरवू नये. पूर्णत्वाकडे जाण्याच्या मार्गात मधली शून्यावस्था ही अंधकारमय, घाबरवणारी असते.

अभ्यास करताना अनेक वेळा मनाच्या एकाग्रतेमुळे काही भौतिक सुखदायक गोष्टी घडून येतात. साधक जर त्या गोष्टीत संतुष्ट झाला तर त्याची साधनेतील प्रगती खुंटते. म्हणून कटाक्षाने अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करून साधकाने आपली साधना चालूच ठेवली पाहिजे. नाहीतर फार मोठ्या प्राप्तीस तो पारखा होईल. इंद्रिय-विषयातील ओढ हे साधनेत विघ्न आहे हे साधकाने पक्के ध्यानात ठेवायला हवे.

भाववृत्त्या हि भावत्वं शून्यवृत्त्या हि शून्यता।
ब्रह्मवृत्त्या हि पूर्णत्वं तथा पूर्णत्वमभ्यसेत्॥ १२७॥

भाववृत्तीत भावत्व शून्यवृत्तीत शून्यता।
ब्रह्मवृत्तीत पूर्णत्व ध्यावे पूर्णत्व सर्वदा॥ १२७॥
भावना असते जैसी जैसी वृत्तिही होतसे
वृत्ती ब्रह्माची ती पूर्ण पूर्णत्व मिळवीतसे॥ १२७॥

माणूस जसा विचार करील तसा तो बनतो. त्याला जर पूर्णत्व मिळवायचे असेल तर त्याने सदैव पूर्णत्वाचेच चिंतन-मनन करावयास हवे. त्यासाठी त्याने द्वैत विचारास सोडून केवळ अद्वैत विचारासच कास धरायला हवी. त्यातच मनुष्यजीवनाचे सार्थक आहे.

© www.madhaveeraghuveer.com

१९ जून २०१८



सर्वं खल्विदं ब्रह्म असा अनुभव येणे ही ब्रह्मवृत्ति आहे. मी सच्चिदानंद आहे असे म्हणताना सत् चित आनंद ही तिन्ही लक्षणे त्यात येतात. जीवात्म्याशी एकरुप होणे — अहं ब्रह्मास्मि
अयमात्मा ब्रह्म
सर्वं खल्विदं ब्रह्म।

ये हि वृत्तिं जहत्येनां ब्रह्माख्यां पावनीं पराम्।
वृथैव ते तु जीवन्ति पशुभिश्च समा नराः॥१३०॥

टाकिती श्रेष्ठ ब्रह्माच्या विचारा अति पावना।
आयुष्य व्यर्थ हो त्यांचे पशुतुल्यचि ते नर॥१३०॥

माणसाचा जन्म हा जीवाला मिळालेला सर्वोत्तम देह आहे. याच जन्मात ब्रह्मविचारापर्यंत जाण्याची क्षमता त्याच्या बुद्धीत आहे, की ज्यायोगे तो सर्व बंधनातून मुक्त (अज्ञानमुक्त) होऊन मोक्षगती मिळवू शकतो. त्याने या जन्मात ही संधी चुकवली तर तो मनुष्य म्हणून घेण्यास योग्य नाही. त्याचे जीवन पशुप्रमाणे समजावे.

अशा तऱ्हेने जे कोणी अत्यंत पवित्र अशा ब्रह्मवृत्तीला टाकतात ते उगीच जगत असतात. ते पशुसमान मानव असतात. असा इशारा आचार्य देतात.

जीवनाचे सार्थक करून घेता आले नाही असे लक्षात आल्यावर जे बेचैनी दिखावा उत्पन्न करतात अशी माणसे परमार्थाच्या मार्गात धुमाकूळ घालतात व ती प्रपंचाला देखील घातक असतात. त्यांचे जीवन व्यर्थ तर असतेच पण हानिकारकही असते.

मोघाशा, मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः।
मोघं पार्थ स जीवति॥

©www.madhaveeraghuveer.com

ये हि वृत्तिं विजानन्ति ज्ञात्वापि वर्धयन्ति ये ।
ते वै सत्पुरुषा धन्या वन्द्यास्ते भुवनत्रये ॥१३१॥

प्रारंभी जाणता वृत्ति वाढवीती निरंतर ।
धन्य वंद्य तिन्ही लोकी होती की नर श्रेष्ठ ते ॥

गीता – तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥४.३८॥
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥६.४५॥
बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ॥७.१९॥

माणसाला अनेक जन्मातील सत्कर्माचे फळ म्हणून या जन्मात ही स्थिति प्राप्त होते. पण त्यासाठी मागे सांगितलेला मार्ग कोटेकोरपणे आचरण करण्याची अनिवार्यता आहे.

जे या वृत्ती जाणतात आणि जाणल्यानंतरही वाढवतात ते सत्पुरुष धन्य होत. ते त्रैलोक्यात वंद्य आणि पूजनीय आहेत.

येषां वृत्तिः समा वृद्धा परिपक्वा च सा पुनः ।
ते वै सद्ब्रह्मतां प्राप्ता नेतरे शब्दवादिनः ॥१३२॥

वृत्तिही अंतरी ज्यांच्या पूर्णत्व मिळते तथा ।
ब्रह्मप्राप्ति घडे त्यांसी वाचाळ इतरजन ॥१३२॥

ज्यांची वृत्ति सम, परिपूर्ण, परिपक्व आणि अनुभवी झालेली असते. ते सर्व सद्ब्रह्माला प्राप्त होतात. इतर नाहीत. केवळ शब्दपंडित तसे होत नाहीत.

ब्रह्म हेच एकमेव सत्य सर्वांस व्यापून राहिले आहे ही भावना ज्यांची वर्धिष्णु आहे तेच पुरुष परिपक्व होऊन स्वतः ब्रह्म होतात. केवळ शाब्दिक बडबड करणारे नाहीत.

© www.madhuveer.com

कुशला ब्रह्मवार्तायां वृत्तिहीनाः सुरागिणः।
तेऽप्यज्ञानतया नूनं पुनरायान्ति यान्ति च॥१३३॥

वाचेने बोलती ब्रह्म इच्छिती फळ भोग जे।
अज्ञ ते पावती जन्म निश्चयाने पुनः पुनः॥१३३॥

ब्रह्म विचारांबद्दल शाब्दिक चर्चा, वाद करण्यात तरबेज असलेले पुरुष ब्रह्मानुभव घेऊ शकत नाहीत. ते भौतिक सुखाभिलाषी असल्यामुळे पुनः पुनः या जगात जन्म घेतात.

शब्दपंडित असे ब्रह्माबद्दल बोलण्यात अत्यंत कुशल, वाचावीर असतात. परंतु वृत्ति (मनोवृत्ति, आचरण) शून्य असतात. ते सुद्धा आपल्या अज्ञानीपणामुळे जन्म मरणाच्या फेऱ्यात अडकतात.

शब्दातून व्यक्त होण्यापेक्षा तुमचे आचरण महत्वाचे आहे. नाहीतर तुमचे पांडित्यच तुम्हाला अडकवू शकते. अध्यात्माच्या क्षेत्रामध्ये ज्ञानाबरोबरच अनुभूति आवश्यक आहे. जे आचारशून्य पंडित असतात, ते संसारातून मुक्त होऊन ब्रह्मप्राप्ती, स्वरूपपद मिळवण्यासाठी निरुपयोगी असतात.

निमिषार्धं न तिष्ठन्ति वृत्तिं ब्रह्ममयीं विना।
यथा तिष्ठन्ति ब्रह्माद्याः सनकाद्याः शुकादयः॥१३४॥

ब्रह्मात बाणता वृत्ति क्षणमात्र ढळू नये।
ब्रह्मादिक शुकाचार्य सनकांची जशी असे॥१३४॥

जे सदैव ब्रह्मविचारात डुबलेले असतात, आणि क्षणभर सुद्धा त्याला विसरत नाहीत, ते ब्रह्मा सनकादि किंवा शुकाचार्यांप्रमाणे ब्रह्मज्ञानीच होतात.

© www.maulaveeraghuveer.com

पंडित ब्रह्ममय वृत्ति केल्याशिवाय निमिषार्ध सुध्दा राहत नाहीत. जसे ब्रह्मादि, सनकादिक किंवा शुकादिक हे सदैव ब्रह्मनिष्ठच होऊन राहतात.

ब्रह्म ज्याच्या आदि आहे, असे हे लोक आहेत. ते क्षणभर सुध्दा ब्रह्मापासून वेगळे नसतात. ते ब्रह्मरुप झालेले असतात.

समर्थ रामदास स्वामी, श्री. रामकृष्ण परमहंस हे अशांपैकी होत. ते सतत ब्रह्माची अनुभूति घेत असत. त्यांनी आपला उत्तराधिकारी नेमला नाही.

६४. कार्यकारण संबंध –

उपक्रम —— उपसंहार —— अन्योन्य संबंध.

परब्रह्म हे कारण तर सृष्टी हे कार्य आहे.

कार्ये कारणता याता कारणे न हि कार्यता।
कारणत्वं तदा गच्छेत् कार्याभावे विचारतः ॥१३५॥

कारणाने घडे कार्य, कार्य ना कारणाविना।
नुरे कारण ज्यावरी कार्य त्याच्यापुढे नुरे ॥१३५॥
रूप कारण बिंबासी, बिंब रूपा कधी नसे।
रूप ना उरते जेव्हा बिंब त्याच्यापुढे नुरे ॥१३५॥

कार्यी कारणता राही कारणात न कार्यता।
विचारे कार्य वर्जुनि बनावे कारण स्वयें ॥१३५॥

प्रत्येक कार्याला काही ना काही कारण असतेच. मात्र प्रत्येक कारणाला कार्य असतेच असे नाही. असे आढळते की कार्याच्या अभावी कारण उरत नाही.

कार्यामध्ये कारणत्व असते परंतु कारणात कार्य नसते. असा विचार केला असता कार्याचा अभाव असेल (म्हणजे मिथ्या) तर स्वतः कारणचे

© www.madhaveeraghuveer.com

(म्हणजे ब्रह्मच) बनून रहावे.

सतत प्रवृत्तिपर राहिले तर निवृत्तिकडे वळणार नाही. प्रवृत्ति ही अशाश्वत तर निवृत्ति ही शाश्वत, चिरंतन आहे.

बाद टळण्यासाठी हा श्लोक आहे.

अथ शुद्धं भवेत् वस्तु यद् वै वाचामगोचरम्।
द्रष्टव्यं मृद्घटेनैव दृष्टान्तेन पुनः पुनः ॥१३६॥

मग ती उरते वस्तु जी वाचा-इंद्रियापर।
मृत्तिका घट दृष्टांते पहावी ती पुनः पुनः॥१३६॥

त्यानंतर जी वस्तु उरते ती अगोचर (इंद्रियांना न समजणारी) आहे. मातीचे घट बघितल्यावर मातीपासून बनणाऱ्या सर्व वस्तूंचे स्मरण होते तद्वत पुनः पुनः यावर विचार करून नित्य अभ्यास करावा.

जी वाणीचा विषय होऊ शकत नाही, अशा त्या शुद्ध सद्वस्तुचा विचार करावा. घटाचा अभाव म्हणजे कार्याचा अभाव झाला तरी माती हे कारण तसेच असते. जगदाभास या विभागातील विवेचनाचा बरोबर विचार करावा.



माती या अधिष्ठानावर घट उत्पन्न झाला. घट नाहीसा झाला तरी माती शिल्लक राहतेच. वृत्ति जर ब्रह्मात्मक घडवायची असेल तर जग हे 'ब्रह्म' या कारणावर उत्पन्न झाले आहे हे समजून ब्रह्मवस्तुचा विचार करावा. ∴ आचार्य शुद्ध चित्ताची महती स्पष्ट करत आहेत. ब्रह्मविचारासाठी चित्तशुद्धी अत्यावश्यक आहे.

© www.madhaveeraghuveer.com

२२ जून २०१६

अनेनैव प्रकारेण वृत्तिर्ब्रह्मात्मिका भवेत् ।
उदेति शुद्धचित्तानां वृत्तिज्ञानं ततः परम् ॥१३७॥

निश्चये याचि मार्गाने चित्त ब्रह्मात लागते ।
प्रकाश श्रेष्ठ ज्ञानाचा शुद्ध चित्तात केवळ ॥१३७॥

अशा प्रकारे सतत अभ्यासाने आपली वृत्ती ब्रह्मभावन बनते. (चित्तात ब्रह्मभावनेचा उदय होतो.) विश्व, ब्रह्मांड या दृश्य वस्तूंच्या मागे एकमेव ब्रह्मच सत्य आणि चिरंतन आहे.

अशा प्रकारे वृत्ति ब्रह्मात्मिका झाल्यानंतर शुद्ध चित्त असणाऱ्याच्या ठिकाणी श्रेष्ठ असे वृत्तिज्ञान उदयाला येते.

मोक्षप्राप्ति, स्वरूपाशी एकरूपता, अपरोक्षानुभूति यासाठी चित्तशुद्धी अत्यावश्यक आहे.

शुद्ध ज्याचा भाव झाला । दुरी नाही देव त्याला ॥ ध्रुवाच्या चरित्रात हे सापडते. तशी आस असेल तरच हे साध्य होते. आपले चित्त मलिन तर होत नाही ना? हा विचार सतत हवा. आपणच आपले साक्षी असतो. स्वतःच्या वर्तनाची चिरफाड करता यायला हवी.

कारणं व्यतिरेकेण पुमानादौ विलोकयेत् ।
अन्वयेन पुनस्तद्धि कार्ये नित्यं प्रपश्यति ॥१३८॥

विश्व कारण जाणावे व्यतिरेकादि अन्वये ।
निष्कर्ष जाणुनी येती ब्रह्म शाश्वत एक ॥१३८॥

अन्वय – जिथे कार्य आहे तिथे कारण असणारच! म्हणून जिथे विश्व आहे त्याचे कारण ब्रह्म ते आहेच आहे.
व्यतिरेक – जिथे कारण नाही तिथे कार्य नाही.

© www.madhavigeraghuveer.com

म्हणजेच जर ब्रह्म नसते तर हे विश्वही झाले नसते. त्याअर्थी विश्व आहे, त्याअर्थी ब्रह्म हे असलेच पाहिजे.

माणसाने प्रथम व्यतिरेकाने कारणावर नजर ठेवावी आणि पुन्हा अन्वयाने कार्यात कारणत्व असतेच हे साधकाने नेहमी लक्षात घ्यावे.

कार्याच्या मुळाशी कारण असतेच हा अन्वय
कारण नसेल तर कार्यही नसतेच हा व्यतिरेक
जग नसले तरी ब्रह्म असणारच – अन्वय
ब्रह्म नसेल तर जग असणारच नाही — व्यतिरेक

ब्रह्म सत्य जगन्मिथ्या असे म्हणत असताना कार्याच्या विचारात मग्न न होता कारणाच्या विचारात मग्न व्हायला पाहिजे हा विचार महत्वाचा!

यत्र यत्र धूमो तत्र तत्र वह्निः।

कार्ये हि कारणं पश्येत् पश्चात् कार्यं विसर्जयेत्।
कारणत्वं ततो गच्छेत् अवशिष्टं भवेत् मुनिः॥१३४॥

मूळ कारण कार्यासी, त्यागावे कार्यरूप ते
उरे कारण जे ब्रह्म मुनी श्रेष्ठ स्वतः बने॥
रूप कारण विनाचे कीं नश्वर होतसे।
चिरंतन असे रूप जाणे तो ब्रह्म होतसे॥१३४॥

जिज्ञासु पुरुषाने प्रत्येक कार्याचे परीक्षण करून त्यातील कारण शोधावे आणि मग त्यातील कार्यभाग वगळून काय उरते, त्याचा शोध घ्यावा. विश्व कार्य वगळल्यावर उरते ते ब्रह्म असे चिंतन करणारा साधक स्वतःच ब्रह्म बनतो. कार्यामध्ये कारण पाहिल्यानंतर कार्याचे विसर्जन करावे. त्यानंतर जे कारणत्व उरेल तेच तो (मुनि) स्वतः बनेल. जेव्हा साधक कार्यापासून संपूर्ण निवृत्त होईल. (ब्रह्मांड संपून जाईल) तेव्हा स्वाभाविकपणे तो ब्रह्माशी एकरूप होईल.

© www.madhaveeraghuveer.com

भावितं तीव्रवेगेन यद्वस्तु निश्चयात्मना।
पुमान् तद् हि भवेत् शीघ्रं ज्ञेयं भ्रमरकीटवत् ॥१४०॥

ध्यास वस्तुचा धरि साधक निश्चित वस्तु बने तो।
भ्रमरासंगे कीटक जैसा भ्रमराचि होऊनि जातो॥१४०॥

साधकाने परा कोटिचा निश्चय, ध्यास घेऊन ब्रह्माचे ध्यान केल्याने साधक स्वतः ब्रह्म होतो. त्याला सत्वर सिद्धी प्राप्त होते. जसा कीटक सतत भ्रमराच्या संगतीत राहिल्याने स्वतःच भ्रमर होतो.
जो अत्यंत उत्कटतेने ज्या वस्तुशी निश्चयाने आपलेपणा धरतो तो अत्यंत शीघ्र गतीने ती वस्तूच होऊन जातो. जशी कुंभारीण माशी!

अदृश्य भावरूपं च सर्वमेव चिदात्मकम्।
सावधानतया नित्यं स्वात्मानं भावयेत् बुधः॥१४१॥

अदृश्य - दृश्य हे सारे साधके बघावे असे
आत्मतत्वाचे ते सारे राहिले पसरूनिया॥
अंतरी उमजे जेव्हा स्वतः ब्रह्माचि मी असे
चैतन्यरूप तो होतो आत्मानंदी बनूनिया॥१४१॥

साधकाने सर्व दृश्य आणि अदृश्य जे आहे ते अति दक्षतेने सावधपणे तपासून घ्यावे. त्याच्या लक्षात येईल की सर्व दृश्य, अदृश्य सर्व काही तो स्वतःच आहे, सर्व चैतन्य - ब्रह्मरूप आहे.
ज्ञानी माणसाने अत्यंत लक्षपूर्वक अदृश्य असूनही सदोदित सर्वत्र चिन्मय रूपाने आणि भावरूपाने रहावे. त्याला सदैव स्वतःच्या ठिकाणी मानावे.

© www.madhaveeradhuveer.com

अविद्येपासून सावधान असावे. तिला पुन्हा प्रवेश करू देऊ नये. चिन्मय रूपाने जे आहे तेच 'मी' आहे, अशी ठाम भावना ठेवावी. सर्व काही भावरूप चिन्मय मी आहे. म्हणूनच मी सदैव चैतन्याने भारलेला असला पाहिजे. जडत्व येता कामा नये. या जाणिवा जेव्हा विस्तारतात तेव्हाच त्याला 'अपरोक्षानुभूति' येते. साधनपूर्ति होते. अहं ब्रह्मास्मि या महावाक्याशी त्याचे नाते जुळते.

दृश्यं तु अदृश्यतां नीत्वा ब्रह्माकारेण चिन्तयेत् ।
विद्वान् नित्यसुखे तिष्ठेत् धिया चिद्रसपूर्णया ॥१४२॥

स्थूलास करुनी सूक्ष्म चिंतावे ब्रह्म हे असे
पूर्ण चैतन्य आनंदी रहावे नित्य साधको
सगुणातून हा जाई मार्ग की निर्गुणाकडे
संपूर्ण सुख आनंद देतसे शुद्ध साधका ॥१४२॥

सर्व दृश्य वस्तूंचा अदृश्यात विलय करून साधकाने विश्वाच्या ठिकाणी ब्रह्मरूपच बघावे, त्यामुळे तो निरंतर चैतन्य सुखाचा अधिकारी होईल.

दृश्य विश्वाला अदृश्यतेपर्यंत पोहोचवणे, सर्वत्र ब्रह्मच आहे, असे चिंतन करून राहिल्याने विद्वान नित्य सुखात राहतो. चिद्रसपूर्ण अशा बुद्धीत दुसरा कोणताही विचार न करता रहावे.

दृक्-दृश्य द्वौ पदार्थौ स्तः। द्रष्टा-दृश्य दृश्य नसले तरी द्रष्टा असतोच. प्रपंच नसला तरी ब्रह्म असतेच. जे जे काही दृश्य आहे ते सर्व मिथ्या समजावे. प्रपंचाचा निरास करत केवळ ब्रह्माचे चिंतन करावे. चिद्रस — ब्रह्मरस — ब्रह्मानंद प्राप्त करायचा असेल तर ब्रह्माकार व्हायला हवे. त्याने अकारण आनंद प्राप्त होतो.

©www.madhaveeraghuveer.com

| S | M | T | W | T | F | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

APRIL - 2015

एभिरङ्गैः समायुक्तो राजयोग उदाहृतः।
किञ्चित् पक्वकषायाणां हठयोगेन संयुतः॥१७३॥

अशा युक्त उपायांसी राजयोगाचि बोलिला।
इच्छायुक्त असे त्यानी आचरावा हठासवे॥१७३॥

अशा प्रकारची ही योगांगे साधकासाठी योग्य प्रकारे सांगितली आहेत. ज्यांच्या भौतिक इच्छा पूर्णपणे मिटलेल्या नाहीत त्यांनी हठयोगाच्या सहाय्याने या योग अंगाचा अभ्यास करावा.
अशा नव्हेने वेगवेगळ्या अंगांनी (७५) युक्त असलेला हा राजयोग सांगितला. परंतु काहींच्या ठिकाणी काही दोष शिल्लक राहतात. अशांनी हठयोगासहित राजयोगाचा मार्ग स्वीकारावा.
पक्व कषाय दोष-बुध्दी परिपूर्ण पक्व न होता त्यात दोष शिल्लक राहतात. हठयोग हा पूरक असू शकतो परंतु अंतिम ध्येय राजयोग हाच आहे.
कोणत्याही प्रकारचा संदेह मनात राहू नये म्हणून —

परिपक्वं मनो येषां केवलोऽयं च सिध्दिदः।
गुरुदैवतभक्तानां सर्वेषां सुलभो जवात्॥१७४॥

परिपक्व मनाने ही सिध्दी प्राप्ताचे केवळ।
गुरु दैवत भक्तांना निश्चये साध्य होतसे॥१७४॥

ज्यांचे चित्त पूर्णपणे शुध्द झाले आहे (राज-योगी) तेच या प्रकारचे पूर्णत्व मिळविण्यास पात्र आहेत. अशा प्रकारची चित्तशुध्दी केवळ गुरु (आचार्य) आणि ईश्वरभक्तांनाच शक्य आहे.

© www.madhaveraghuveer.com

ज्यांची मने परिपूर्ण पक्व झाली आहेत, अशांना हा सिद्धिप्राप्त होतो. पण गुरु हेच दैवत मानणाऱ्या भक्तांना हा सर्वांत सुलभ मार्ग आहे.

<u>प्रामस्य प्राप्ति:</u> । अशा स्वरूपाचे आत्मज्ञान होय '<u>अपरोक्षानुभूति</u>'! हेच तत्त्वबोधात आचार्य सांगतात. ही व्याख्या लक्षात घेतली तर अपरोक्ष ज्ञान प्राप्त झालेल्या त्या व्यक्तीचे वर्णन म्हणजेच 'जीवन्मुक्त' होय.



© www.madhaveeraghuveer.com